

कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण

विद्वान् सर्वत्र पूज्यते।
स्थापना १२ मे १९०९



शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री.
तथा अण्णासाहेब खैर


पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

**Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine August 2026 - Pages - 52**

संपादक : श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे          कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

* पुणे * वर्ष ७७ * अंक १० * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-





शनिवार दि. १८ जुलै २०२६ रोजी आयोजित केलेल्या
डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ शाखा, नाशिक
रौप्य महोत्सवी वर्ष सांगता समारंभ प्रसंगी तयार केलेल्या स्मरणिचे प्रकाशन करताना
प्रमुख पाहुणे डॉ. सदानंद मोरे, संत तुकाराम महाराजांचे वंशज, प्रसिध्द लेखक,
विचारवंत आणि संत साहित्याचे अभ्यासक,
यांच्या समवेत डावीकडून कार्यवाह श्री. संजय गुंजाळ,
संचालक श्री. आनंद कुलकर्णी व प्रा. राजेंद्र कडुसकर,
कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी,
श्री. प्र. द. कुलकर्णी आणि कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ

## ❊ डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ शाखा, नाशिक ❊




रौप्य महोत्सवी वर्ष सांगता समारंभानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करताना प्रमुख पाहुणे मा. डॉ. सदानंद मोरे, समवेत संस्था पदाधिकारी, संचालक आदी मान्यवर



डॉ. सदानंद मोरे यांचा शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करताना ↑ कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत देणगीदार श्रीमती सिंधुताई धामणकर, संस्था पदाधिकारी, संचालक, श्री. प्र. द. कुलकर्णी आदी मान्यवर



उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. सदानंद मोरे →

## ❊ संस्था मुख्यालय, पुणे ३० ❊



देणगीदार श्रीमती उषा क्षीरसागर यांनी दि. १९ जुलै २०२६ रोजी संस्थेस रु. १,००,१०१/- ची देणगी दिली. या प्रसंगी उपस्थित श्रीमती उषा क्षीरसागर, श्रीमती अंजली क्षीरसागर, सौ. उषा बक्षी व वसतिगृहाचे रेक्टर श्री. प्रदीप पाटील



दि. २० जुलै २०२६ रोजी देणगीदार श्रीमती अंजली क्षीरसागर यांना स्मृतिचिन्ह देऊन आभार व्यक्त करताना कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी

संपादकीय

# मादाम कामा

'स्वातंत्र्य हे मानवी जीवनातील एक सर्वोच्च मूल्य आहे' या विचाराचा पाठपुरावा करीत भारतीय स्वातंत्र्यासाठी अथकतेने जीवाची बाजी लावून भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होणारी जी मंडळी होती त्यातले एक आघाडीचे व्यक्तिमत्त्व म्हणजे मादाम कामा.

२४ सप्टेंबर १८६१ रोजी मादाम कामा यांचा जन्म झाला. मादाम कामा यांचे वडील सोराबजी पटेल यांनी कायद्याचे शिक्षण घेतलेले होते पण, त्यांचा स्वतःचा व्यापार होता. मादाम कामा यांच्या आई जायजीबाई पटेल या गृहिणी होत्या. पटेल घराणे हे मुंबईतील एक सुप्रतिष्ठित आणि धनाढ्य घराणे होते. मादाम कामा यांनी आपले शालेय शिक्षण 'अलेक्झांड्रा नेटिव्ह गर्ल्स हायस्कूल' या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून पूर्ण केले. १८८५ मध्ये रुस्तुमजी कामा यांच्याशी त्यांचा विवाह झाला. कामा परिवार हा सुध्दा पटेल घराण्याच्याच तोडीचा होता. मादाम कामा जरी पाश्च्यात्य संस्कृतीचा पगडा असलेल्या वातावरणात वाढल्या असल्या, इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून शिकल्या असल्या तरी, त्यांची नाळ मात्र भारतीय संस्कृतीशीच जुळलेली होती. अंतःकरणाने आणि आचारविचाराने त्या पारसी आणि हिंदुस्थानी संस्कृतीशीच एकरूप झाल्या होत्या. त्यांची झरतुष्ट्रांवर श्रध्दा होती. सत्‌विचार, सत्‌भाषा आणि सत्‌कृती या जीवनत्रयींवर त्यांची नितांत श्रध्दा होती. त्या सदैव पारंपरिक पारसी पोशाखातच वावरत. आपल्याबरोबर नेहमी 'अवेस्ता' हा पवित्र धर्मग्रंथ बाळगत.

मादाम कामा यांचा पिंड समाजसेवेचा असल्याने मुंबईमध्ये १८९६ साली उद्‌भवलेल्या प्लेगच्या साथीत प्लेगग्रस्त रुग्णांच्या शुश्रुषेला त्यांनी स्वतःला वाहून घेतले. रुग्णसेवेत असतानाच त्यांना स्वतःला प्लेगने गाठले. या जीवघेण्या आजारातून त्या बऱ्या झाल्या पण, प्लेगमुळे त्यांच्या अंगातील शक्तीचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास झाला होता. अतिशय अशक्ततेने त्यांना ग्रासल्याने उपचारार्थ त्या ब्रिटनला गेल्या.

ब्रिटिशांनी प्लेगकाळात भारतीय जनतेवर जे अनन्वित अत्याचर केले त्यामुळे मादाम कामा या अंतर्यामी अतिशय अस्वस्थ होत्या. उद्विग्न होत्या. त्याचबरोबर स्वतःच्या साम्राज्य विस्तार आणि समृध्दीसाठी भारतीयांवर चढत्या भाजणीने होत असलेल्या ब्रिटिशांच्या अत्याचारांमुळे सुध्दा त्यांच्या मनातला ब्रिटिश साम्राज्याचा विरोध हा प्रचंड प्रमाणात वाढत होता. त्यामुळे त्यांची स्वतःला भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात झोकून दिले.

दादाभाई नौरोजी यांच्या सचिव म्हणून काम करत त्यांनी भारतीय राजकारणात प्रवेश केला. कालांतराने त्या शामजी कृष्ण वर्मा यांच्या राजकीय तत्त्वज्ञानाने भारून गेल्या. १९०५ मध्ये शामजी कृष्ण वर्मा, श्री. मंचेर शहा गोदरेज, श्री. सरदार सिंह राणा आदींनी इंडियन होमरूल सोसायटीची स्थापना केली. मादाम कामा यांचा या सोसायटी कार्यात ठोस सहभाग होता. १९०५ मध्येच लंडन येथील 'इंडिया हाऊस' च्या व्यवस्थापनातही त्यांचा सिंहाचा वाटा होता. भारतातून इंग्लंडमध्ये शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना या इंडिया हाऊसचा मोठाच आधार होता. वेळप्रसंगी मादाम कामा या विद्यार्थ्यांना स्वतः पदरमोड करून अर्थसहाय्य करीत. १९०७ मध्ये जर्मनी मधल्या स्टुटगार्ट शहरात दुसऱ्या इंटरनॅशनल सोशलिस्ट कॉँग्रस परिषदेला बॅरिस्टर राणा यांच्या समवेत मादाम कामा उपस्थित होत्या.

भारतीय जनतेवर ब्रिटिशांकडून केल्या जाणाऱ्या अन्यायांचा आणि जुलमांचा पाढाच मादाम कामा यांनी या परिषदेत विस्तृतपणे आणि पुराव्यानिशी मांडला. भारतातील गरिबी आणि सामाजिक अन्याय, सर्वसामान्य भारतीय नागरिकाला सहन करायला लागणारा जुलूम या सर्वांचे एकमेव मुख्य कारण म्हणजे, साम्राज्यवादी ब्रिटिशांनी चालवलेली भारताची अंधाधुंद लूट हेच आहे असे मत मादाम कामा यांनी ओघवत्या आणि उत्तम दर्जाच्या इंग्रजीमधून मांडले आणि जगभरातील सर्व समाजवाद्यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन केले.

आपल्या भाषणाचा समारोप करताना मादाम कामा यांनी या आंतरराष्ट्रीय परिषदेत भारताचा तिरंगा फडकवला होता. या ध्वजासंदर्भात मादाम कामा यांनी परिषदेत उद्‌गार काढले होते, This flag is of Indian Independence. Behold. It is born. It is already sanctioned by the blood of Indian youth. I call upon you gentleman to rise and salute the flag of Indian Independence.

मादाम कामा यांनी फडकवलेल्या या तिरंग्यात हिरव्या, केशरी आणि लाल रंगाचे एका खाली एक असे पट्टे होते. हिरवा रंग हा अग्रभागी असून त्यावर आठ सोनेरी कमळे होती. त्या काळातील ब्रिटिश भारतातील आठ प्रांतांचे ते प्रतीक होते. झेंड्याच्या 'मधोमध वेदमंत्राहूनी आम्हा वंद्य' असलेला 'वंदे मातरम्' हा मंत्र होता आणि त्याखाली तिसऱ्या पट्ट्यावर कोपऱ्यात सूर्य आणि चंद्रकला होती. पुढे हा ध्वज त्याकाळचे एक स्वातंत्र्यसेनानी 'इंदुलाल याज्ञिक' यांनी भारतात आणला होता. मादाम कामा यांनी भारतीय स्वातंत्र्याचे मुखपत्र असलेले 'वंदे मातरम' हे वर्तमानपत्रही सुरू केले होते. इंग्रजांचे अत्याचार वेशीवर टांगणे आणि भारतीयांच्या मनात स्वातंत्र्याबद्दलची तीव्र ओढ आणि आत्मीयता निर्माण करणे अशी या वर्तमानपत्राची प्रमुख उद्दिष्टं होती. ब्रिटिशांच्या वाढत्या दडपशाहीला जशास तसे प्रत्युत्तर देण्यासाठी मादाम कामा यांनी अतिशय कौशल्यपूर्वक हिंदुस्थानात बंदुका आणि इतर युध्दसाहित्य पाठवण्यासही प्रारंभ केला होता. 'हाईड पार्क' येथेही मादाम कामा भारतीय स्वातंत्र्याबद्दल जनमत जागृत करण्यासाठी जाहीर भाषणे देत.

मादाम कामा यांच्या या स्वातंत्र्यलढ्यातील सक्रिय सहभागामुळे त्या काळच्या ब्रिटिश इंटेलिजन्सने त्यांना 'The most Dangerous Indian lady' हा किताब दिला होता.

कालांतराने ब्रिटिशांच्या जाचक निर्बंधांमुळे मादाम कामा यांनी पॅरिस मधून स्वातंत्र्यचळवळीची सूत्र हलविण्यास प्रारंभ केला. आयरिश आणि रशियन क्रांतिकारकांशीही त्यांचा चांगलाच संपर्क होता. भारतीय क्रांतीकारकांना रशियन क्रांतिकारकांच्या मदतीने त्यांनी बॉंब विद्येचेही प्रशिक्षण दिले.

मादाम कामा यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यासंदर्भात जगजागृती करण्यासाठी अमेरिकेचाही दौरा केला होता. अमेरिकेतील वर्तमानपत्रांमध्ये ब्रिटिशांच्या भारतातील दडपशाहीबद्दल त्यांनी निर्भीडपणे लेखन केले. वृत्तपत्रांना मुलाखती दिल्या. मादाम कामा ज्या तडफदारपणे आणि हिरहिरीने भारतीय स्वातंत्र्याचा पाठपुरावा करत होत्या ते पाहून अमेरिकेतली भारतीय जनता त्यांना 'जोन ऑफ आर्क' म्हणून ओळखू लागली होती.

मादाम कामा यांनी आपल्या कार्याला भारतीय स्वातंत्र्यापुरतेच मर्यादित ठेवले नव्हते. ब्रिटिश स्त्रियांच्या मतदान हक्कांसाठीच्या चळवळीतही त्या सक्रिय होत्या. मादाम कामा स्त्रीपुरुष समानतेबाबतही आग्रही होत्या. १९१० मध्ये इजिप्त येथील एका संमेलनात फक्त पुरुष प्रतिनिधींचीच उपस्थिती पाहून भरसभेत त्यांनी

उपस्थितांना प्रश्न केला होती की, 'Where are your mothers? Where are your sisters? राष्ट्र उभारणीच्या कार्यात त्या कृश हातांनी केलेली महत्त्वपूर्ण कामगिरी आठवून पहा. त्याकडे दुर्लक्ष करू नका'. असे विचार त्यांनी इजिप्तच्या त्या पुरुषप्रधान देशातील सभेत मांडले.

मादाम कामा या स्वातंत्र्यलढ्याच्या जननीच होत्या. '१८५७ चे स्वातंत्र्य समर' हे स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकांचे पुस्तक प्रकाशित करण्यासाठी मादाम कामा यांनी अर्थसहाय्य तर केले होतेच पण, त्या पुस्तकाच्या प्रती गुप्तपणे हिंदुस्थानात पाठवण्याच्या कामातही त्या सहभागी होत्या. सावरकरांच्या मुक्ततेसाठी त्यांनी आंतरराष्ट्रीय न्यायालयात धाव घेतली होती. खटल्याचा बराचसा आर्थिक भारही त्यांनी उचलला होता.

मादाम काम यांच्या या ब्रिटिश साम्राज्याविरूध्दच्या उपद्व्यापी कारभारामुळे फ्रान्स सरकारला ब्रिटिशांनी मादाम कामा यांना हद्दपार करण्यास सांगितले पण, फ्रेंच सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले. परंतु १९१४ मध्ये उद्भवलेल्या पहिल्या महायुध्दामुळे, दोस्त राष्ट्रात सहभागी असल्यामुळे फ्रेंच सरकारने मादाम कामा यांना अटक केली. पण, कालांतराने त्यांच्या आरोग्याचे कारण पुढे करून त्यांची सुटकाही केली.

१९३५ च्या सुमारास मादाम कामा यांची तब्येत अतिशय खालावली. कदाचित आपली अखेर जवळ आल्याचे जाणवल्यामुळे त्यांना आता मातृभूमीची ओढ लागली. त्या संदर्भात ब्रिटिश सरकारच्या परवानगीसाठी त्यांनी अर्ज केला असता तो फेटाळला गेला पण, एकंदर राजकीय परिस्थितीचा विचार करून मादाम कामा यांना ब्रिटिश साम्राज्याच्या विरोधातील कोणत्याही कृत्यात सहभागी न होण्याच्या अटीवर हिंदुस्थानात जाण्याची परवानगी देण्यात आली. नोव्हेंबर १९३५ मध्ये मादाम कामा भारतात परतल्या, भारतात आल्यावर त्यांना तत्काळ पेटिट पारसी जनरल हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात आले. पण १३ ऑगस्ट १९३६ रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी मादाम कामा यांचे निधन झाले.

स्वतंत्र, एकसंध आणि लष्करी दृष्ट्या भारत एक बलवान राष्ट्र असावे हे मादाम कामा यांचे स्वप्न होते. त्यांच्या स्वप्नातील भारत हा प्रजासत्ताक होता. त्या प्रजासत्ताक भारताची एक भाषा आणि एक लिपी असावी असे त्यांचे मत होते. स्वतंत्र भारतात वर्गभेद आणि वर्णभेद नसावा याबाबतही त्या आग्रही होत्या.

आपल्या पैतृक संपत्तीतील भरघोस रक्कम म्हणजे जवळजवळ ५५ हजार रुपये त्यांनी दान केले होते. पण, तो पैसा क्रांती कार्यासाठी वापरला जाऊ शकेल म्हणून ब्रिटिशांनी त्यामध्ये अडथळे आणण्याचा प्रयत्न केला. मादाम कामा यांनी आपले दागदागिने, घरातील सर्व सामान मुलींसाठी स्थापन करण्यात आलेल्या बाई आवाबाई पेटिट अनाथाश्रमला दान दिले. उरलेली सर्व संपत्ती फ्रामजी पटेल या माझगावमधल्या अग्यारीला दिली.

सत्ताधाऱ्यांविरूध्दचा एकमेव यशस्वी धर्म म्हणजे देशभक्ती Resistance to tyranny is obedience to God - हे मूल्य आपल्या आयुष्यभर जोपासणाऱ्या मादाम कामा म्हणजे भारतीय स्वातंत्र्य युध्दातील दुर्गेचेच एक रूप होते.

**आपणा सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा !**

दि. २९ जुलै २०२६
गुरूपौर्णिमा



**गीतामहर्षी स्वर्गीय गुरूवर्य डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर**

**स्थळ :**
**पुणे विद्यार्थी गृहाचे**
**दादासाहेब केतकर सभागृह,**
मुक्तांगण इंग्लिश स्कूल आवार,
४४, विद्यानगरी, शिवदर्शन,
पर्वती, पुणे ४११००९.
फोन - ०२०-२४४७०९२७

# डॉ. खैरकुल गीता-निधी स्मृती व्याख्यानमाला
## चाळीसावे पुष्प

स. न. वि. वि.

गीतामहर्षी व शिक्षणतज्ज्ञ स्वर्गीय गुरूवर्य डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर यांच्या ४०व्या स्मृतिदिनानिमित्त **शनिवार दि. २९/०८/२०२६** रोजी **दुपारी ४ वाजता** प्रकट व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

**व्याख्याते : मा. प्रा. प्रसाद प्रकाश जोशी**

**प्रभारी कुलगुरू, डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था**
**(अभिमत विद्यापीठ, पुणे)**

**विषय : भगवद्गीतेतील कर्ताविषयक विचार**

कृपया आपण या कार्यक्रमास जरूर यावे, ही विनंती.

आपले नम्र

| **दिनेश मिसाळ** | **कृष्णाजी कुलकर्णी** | **संजय गुंजाळ** | **अमोल जोशी** | **एस.एम.जिर्गे** | **राजेंद्र बोऱ्हाडे** |
|---|---|---|---|---|---|
| कुलसचिव | कोषाध्यक्ष | कार्यवाह | उपकार्याध्यक्ष | उपकार्याध्यक्ष | कार्याध्यक्ष |

पुणे विद्यार्थी गृह, पुणे ४११ ०३०

# प्रश्नाने ज्ञान वाढते ॥

गाडीत प्रवास करताना किंवा व्यवहारात अन्य प्रसंगी एखादा अपरिचित मनुष्य तुम्हाला भेटतो. त्यावेळी तुम्ही त्याला काय प्रश्न विचारता? तो तुम्हाला काय प्रश्न विचारतो? संभाषण किती वेळ चालते? केव्हा थांबते? का? या संभाषणातून तुम्हाला फायदा काय झाला? आनंदात वेळ जाऊन ज्ञानात आणि अनुभवात भर किती पडली? अपरिचित माणसांशी बोलताना प्रश्न विचारण्याविषयी काही विशेष असे तुमचे धोरण असते, का तोंडाला येतील ते आणि मनाला येतील ते प्रश्न विचारता?

मी एकदा एका मोठ्या पगाराच्या व अधिकाराच्या तरुण व्यक्तीला भेटावयास गेलो. भेट कामाची नसून केवळ परिचयार्थ होती. घरी परत जाताना मी विचार करू लागलो. तेव्हा माझ्या लक्षात आले की, तासभर मीच प्रश्न विचारीत होतो आणि तो फक्त उत्तरे देत होता. त्याने मला एकही प्रश्न विचारला नाही. त्याच्यापासून मी पुष्कळ उपयुक्त माहिती मिळविली; पण माझ्यापासून घेण्यासारखे काही असेल असे त्याला वाटले नाही. त्याने मला एकही प्रश्न विचारला नाही. त्याला माझ्याकडून घेण्यासारखे काही नव्हते!! त्याच्या बुद्धीची मला कीव वाटली.

विचाराच्या व ज्ञानाच्या दृष्टीने मी संपन्न झालो. तो बिचारा होता तेथेच राहिला! असाच अनुभव मला अनेक वेळा येतो.

प्रश्न विचारावयासही स्वत: विचार करावा लागतो. ज्याला विचारता येत नाही त्याची बुद्धी तरी कमी असते किंवा असलेली बुद्धी निकामी तरी होत चाललेली असते. विचार करणाराला प्रश्न सुचतात. पण विचारशून्य माणसाला प्रश्न सुचत नाहीत.

प्रश्नामुळेच ज्ञानाची निर्मिती झाली; तत्त्वज्ञान, विज्ञान, शास्त्रे यांची वाढ झाली. सुजाणपणाने प्रश्न विचारण्याची कला साध्य करा. ज्ञानाची पुष्कळ दालने खुली होतील. प्रश्न इतरांना विचारा. तसेच स्वत:लाही मधून मधून प्रश्न विचारा.

**डॉ. ग. श्री. खैर (सप्टेंबर १९५७)**

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९

**उपकार्याध्यक्ष : श्री. एस. एम. जिर्गे**
**संचालक : श्री. आनंद कुलकर्णी**
**प्राचार्य : सौ. जयती नरवणे**
**मुख्याध्यापिका : सौ. रेखा बाली**

## पूर्व प्राथमिक विभाग

### महिना अखेर उपक्रम

मंगळवार दि. ३० जून २०२६ रोजी महिना अखेर उपक्रमांतर्गत सर्व विद्यार्थी रंगीत कपडे परिधान करून आले होते. शिशु गटातील विद्यार्थ्यांनी चित्रकलेच्या वहीमध्ये घोटीव कागदाची होडी तयार करून चिकटवली. छोट्या गटातील विद्यार्थ्यांनी चित्रकलेच्या वहीमध्ये छत्रीचे चित्र रंगविले. मोठ्या गटातील विद्यार्थ्यांसाठी 'मोबाईलचे दुष्परिणाम' अशी छोटीशी नाटिका दाखवली.

### वृक्षारोपण सप्ताह

बुधवार दि. ९ जुलै रोजी वृक्षारोपण सप्ताहानिमित्त विविध उपक्रम घेण्यात आले. शिशु गटातील विद्यार्थ्यांनी झाडाच्या चित्रामध्ये तळहाताचे ठसे घेतले. छोट्या गटातील विद्यार्थ्यांनी चित्रकलेच्या वहीत झाडाच्या पानांचे ठसे घेतले. मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी प्रत्येक्षात मोठ्या कुंडीमध्ये हळीवाच्या बिया आणि तुळशीच्या मंजिऱ्या घालून वृषारोपण दिवस साजरा केला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना झाडांचे उपयोग व महत्त्व सांगितले.

### मुव्ही डे

शुक्रवार दि. १७ जुलै २०२६ रोजी 'मुव्ही डे' अंतर्गत पूर्व-प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांना स्पोर्ट्स हॉलमध्ये छोटे चित्रपट दाखविण्यात आले.

### श्लोक पठण

सोमवार दि. २० जुलै २०२६ रोजी मोठ्या गटातील विद्यार्थ्यांना संस्कृत भारतीच्या शिक्षिकांनी संस्कृत श्लोक शिकविण्यास सुरूवात केली. सरस्वती पूजनाने या कार्यक्रमाची सुरूवात झाली.

## प्राथमिक विभाग

### पालक प्रतिनिधी व माता -पालक सभा

शनिवार दि. ४ जुलै २०२६ रोजी पहिली माता-पालक व पालक प्रतिनिधी यांची सभा घेण्यात आली. या सभेत मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली यांनी मुख्य मुद्द्यांवर पालकांशी चर्चा केली. शाळेतील विविध उपक्रम, स्पर्धा, अभ्यास याविषयी यावेळी माहिती देण्यात आली. पर्यवेक्षिका सौ. शिरिन अकोलावाला व सर्व शिक्षिका यावेळी उपस्थित होत्या.

### अभिनंदनीय

### टि.म.वि.परीक्षा निकाल

फेब्रुवारी २०२६ मध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या शालेय परीक्षा विभागामार्फत घेण्यात आलेल्या 'Mathematics First' परीक्षेत विद्यार्थिनी कु. अनुश्री केदारी हिने उल्लेखनीय यश संपादन केले. या परीक्षेत तिने १०० पैकी ९३ गुण मिळवून प्रथम श्रेणी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण होण्याचा मान मिळवला. कु. अनुश्री हिच्या या यशाबद्दल तिला प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

### शिष्यवृत्ती परीक्षा निकाल (इ. ५ वी)

फेब्रुवारी २०२६ मध्ये झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. या परीक्षेत कु. सौमित्र प्रसाद कुलकर्णी याने अर्बन जनरल 'K' प्रवर्गात जिल्हा गुणवत्ता यादीत ६७ वा क्रमांक मिळविला. तसेच कु. अनिष्का मंगेश मुळे हिने जिल्हा गुणवत्ता यादीत ४०६ वा क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश मिळविले. त्यांच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एका यशाची भर पडली असून, पुढील वाटचालीस त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

### इंग्रजी हस्ताक्षर स्पर्धा

मंगळवार दि. ७ जुलै २०२६ रोजी शाळेत इंग्रजी हस्ताक्षर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत इयत्ता १ली ते ६वीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे

सहभाग घेतला. या स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे

| इयत्ता | विद्यार्थ्याचे नाव | इ/तु | क्रमांक |
|---|---|---|---|
| १ली | कु. विराज काकडे | १ब | प्रथम |
| | कु. श्रीश मारणे | १क | द्वितीय |
| | कु. पारस पाटोळे | १ड | तृतीय |
| २री | कु. आरोही मधेसिया | २क | प्रथम |
| | कु. रुद्र शिंदे | २ ई | द्वितीय |
| | कु. अविर कांबळे | २क | तृतीय |
| ३री | कु. विघ्नेश सावंत | ३ ड | प्रथम |
| | कु. वीरा खरात | ३क | द्वितीय |
| | कु. शौर्य शेटे | ३ई | तृतीय |
| ४थी | कु. मैथिली तेलंगी | ४ई | प्रथम |
| | कु. तन्वी कापरे | ४क | द्वितीय |
| | कु. शरण्या रेडेकर | ४ ड | तृतीय |
| | कु. वेदांग खिलारे | ४ क | तृतीय |
| ५वी | कु. ईशान माने | ५ड | प्रथम |
| | कु. अवनी तांबेकर | ५ ई | द्वितीय |
| | कु. मृणाल अरणे | ५अ | तृतीय |
| ६वी | कु. अन्वी धारणकर | ६अ | प्रथम |
| | कु. स्वरा कुलकर्णी | ६क | द्वितीय |
| | कु. समीक्षा सुरवसे | ६ई | तृतीय |

### मॅथ जिनियस स्पर्धा उत्साहात संपन्न

रविवार दि. १९ जुलै २०२६ रोजी एस. आय. पी. अकॅडमी आयोजित 'मॅथ जिनियस स्पर्धा' उत्साहात पार पडली. इ. २री व ३रीतील विद्यार्थ्यांनी यात उत्स्फूर्त सहभाग घेतला. स्पर्धेत विद्यार्थ्यांच्या गणिती आकलन, तर्कशक्ती व विचारक्षमतेची चाचणी घेण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये गणिताविषयी आवड आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली.

### ईबेक भाषा परिचय

रविवार दि. १९ जुलै २०२६ रोजी ईबेक भाषा परिचय कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात इंग्रजी, जर्मन व जपानी भाषांची माहिती, संभाषण कौशल्य, वाचन उपक्रम आणि भाषिक खेळांची ओळख करून देण्यात आली. पालक व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध अभ्यासक्रमांची माहिती जाणून घेतली.

### बुद्धिबळ स्पर्धा २०२६

रविवार दि. १९ जुलै २०२६ रोजी शाळेच्या प्राथमिक विभागात आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ दिनानिमित्त JK's Excellence Chess Academy यांच्या वतीने आंतरशाखीय बुद्धिबळ स्पर्धेचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत इ. १ ली ते १० वीपर्यंतच्या विविध वयोगटातील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत आपल्या बुद्धिमत्ता, एकाग्रता आणि रणनीतीपूर्ण खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. स्पर्धेतील सर्व सामने अत्यंत चुरशीचे व रोमांचक झाले. विजेत्या विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या आकर्षक ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थी कु. पियुष शेवाळे - इ.४थी आणि कु. दिग्विजय घारे - इ. ५वी या विद्यार्थ्यांना बक्षिसे मिळाली.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

## माध्यमिक विभाग

### पालक शिक्षक सभा

दि. २७ जून २०२६ रोजी इ. ७ वी ते १० वीच्या पालकांची सभा आयोजित करण्यात आली होती. स्मार्ट बोर्डच्या माध्यमातून वर्गशिक्षकांनी पालकांशी शालेय महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली व त्यांच्या शंकांचे निरसन केले. सर्व वर्गशिक्षकांनी आणि प्रत्येक विषयाच्या शिक्षकांनी पाठ्यक्रम आणि परीक्षांचे स्वरूप यावर सविस्तर माहिती पालकांना देऊन त्यांच्याशी संवाद साधला.

या सभेत पालक प्रतिनिधींची निवड करण्यात आली. सर्व पालकांनी सभेस चांगला प्रतिसाद दिला.

## पालक प्रतिनिधी सभा व माता पालक प्रतिनिधी सभा

दि. ४ जुलै २०२६ रोजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाची पहिली शिक्षक - पालक प्रतिनिधी सभा व माता पालक प्रतिनिधी सभा घेण्यात आली. या सभेत उपस्थित पालक प्रतिनिधींमधून काही पालकांची विविध पदांवर नियुक्ती करण्यात आली. यावेळी माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या प्राचार्य सौ. जयती नरवणे यांनी उपस्थित पालक प्रतिनिधींशी संवाद साधला व महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली. या सभेसाठी पर्यवेक्षिका सौ. विजया काळे, सौ. गौरी राजगुरू, उच्च माध्यमिक विभागाच्या प्रमुख डॉ. सौ. स्वाती निकम तसेच इ.५ वी ते इ. १२ वीच्या वर्गशिक्षिका व पालक प्रतिनिधी उपस्थित होते.

## एनसीसी शिबिरामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग

पुणे येथील '३ महाराष्ट्र एअर स्कॉड्रन एनसीसी' (३ Maharashtra Air Sqn NCC) येथे दि. १५ ते २४ जून २०२६ या कालावधीत एनसीसी एअर विंगच्या कॅडेट्ससाठी 'संयुक्त वार्षिक प्रशिक्षण शिबिर' (CATC) आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात प्रशालेच्या २२ कॅडेट्सनी प्रश्नमंजुषा, सांस्कृतिक कार्यक्रम, थ्रो-बॉल, व्हॉलीबॉल आणि कवायत (ड्रिल) यांसारख्या विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन थ्रो-बॉल स्पर्धेत विजेतेपदाची ट्रॉफी पटकावली, तसेच कवायत आणि इतर खेळांमध्येही अत्यंत चुरशीची स्पर्धा सादर केली. सहभागी सर्व कॅडेट्सना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या शिबिरादरम्यान '२ विंग लोहगाव' आणि 'युद्ध स्मारक' येथे भेटींचे आयोजन करण्यात आले होते. तिथे कॅडेट्सना 'सुखोई ३० एमकेआय' हे विमान जवळून पाहण्याचा आणि त्याचा अभ्यास करण्याचा रोमांचक अनुभव मिळाला. तसेच, त्यांनी एटीसी आणि हवाई दलाच्या हवामानशास्त्र विभागालाही भेट दिली. या प्रसंगी विद्यार्थ्यांसोबत शाळेतील शिक्षिका सेकंड ऑफिसर श्रुती कांबळे उपस्थित होत्या.

## चित्रकला स्पर्धा

प्रशोलत दि. ३ जुलै २०२६ रोजी पुणे महानगरपालिकेने पुणे प्रथम-सेवा-वारीच्या 'कलावारी' प्रकल्पांतर्गत चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. प्रशालेतील इ. ७वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. चित्रकला शिक्षिका सौ. सीमा जोशी व सौ. धनश्री गुर्जर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## 'स्पार्क इंडिया प्रोग्राम - २' चे उद्‌घाटन

दि. ३ जुलै २०२६ रोजी 'स्पार्क इंडिया प्रोग्राम - २' चा उद्‌घाटन सोहळा हुजूरपागा गर्ल्स हायस्कूल, लक्ष्मी रोड, पुणे येथे पार पडला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून इस्रोचे (ISRO) माजी संचालक श्री. प्रमोद काळे उपस्थित होते. तसेच, इस्रोचे संचालक व शास्त्रज्ञ श्री. विष्णू लाल आणि चांद्रयान मोहिमेत योगदान देणारे इस्रोचे शास्त्रज्ञ श्री. सतीश राव हे मान्यवरही यावेळी उपस्थित होते. प्रशालेतील विद्यार्थी गेल्या वर्षापासून या उपक्रमाशी जोडलेले आहेत. उद्‌घाटन समारंभादरम्यान पहिल्या तुकडीतील (बॅच १) विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रकल्प सादर केले आणि अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल त्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. यावेळी सौ. विद्या सालेहित्तल यांनी उपस्थितांना 'स्पार्क इंडिया प्रोग्राम'बाबतचा आपला अनुभव सांगितला.

## इको क्लबचा उद्‌घाटन सोहळा

विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयक जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने दि. १३ जुलै २०२६ रोजी शाळेच्या आवारात 'इको क्लब'चे उद्‌घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास 'वृक्ष संवर्धिनी' या स्वयंसेवी संस्थेच्या सदस्या सौ. प्रिया भिडे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरूवात सौ. प्राची कोल्हटकर यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. उद्‌घाटनाचा भाग म्हणून सौ. प्रिया भिडे यांनी मुख्याध्यापिका सौ. जयती नरवणे आणि पर्यवेक्षिका सौ. विजया काळे व सौ. गौरी राजगुरू यांच्यासमवेत रोपांना पाणी घातले.

इ. ७वी आणि ८वीच्या इको क्लबच्या सर्व सदस्यांनी, कु. स्वरा बहिरट यांच्या नेतृत्वाखाली पर्यावरण रक्षण प्रतिज्ञा घेतली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सौ. विद्या सालेहित्तल यांनी करून दिला. दुसरा महत्त्वाचा उपक्रम म्हणजे 'बायो-एंझाइम' (नैसर्गिक सेंद्रिय द्रावण) बनवण्याचे प्रात्यक्षिक दिले. सौ. प्रिया भिडे यांनी फळांची साल, गूळ आणि पाणी यांचा वापर करून स्वयंपाकघरातील कचऱ्यापासून नैसर्गिक व रसायनमुक्त स्वच्छता द्रव (क्लीनिंग लिक्विड) बनवण्याची प्रक्रिया समजावून सांगितली. आपल्या भाषणात सौ. भिडे यांनी विद्यार्थ्यांना शाश्वत जीवनशैलीचा अवलंब करण्याच्या दिशेने छोटी पावले उचलण्यासाठी प्रोत्साहित केले. कार्यक्रमाची सांगता कु. हेरंब वाशिकर यांच्या आभार प्रदर्शनाने झाली.

**विज्ञान क्लब**

दि.१६ जुलै २०२६ रोजी विज्ञान क्लबचे उद्घाटन करण्यात आले. आय. आय. एस. ई. आर. (IISER) पुणे येथील 'सायन्स ॲक्टिव्हिटी सेंटर'चे वरिष्ठ तांत्रिक अधिकारी श्री. अशोक रूपनर यांच्या हस्ते या मंडळाचे उद्घाटन झाले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन एका वैशिष्ट्यपूर्ण वैज्ञानिक पद्धतीने करण्यात आले. सोडियम हायड्रॉक्साइडचा वापर करून लिहिलेले विज्ञान मंडळाचे नाव, प्रमुख पाहुण्यांनी फिनॉल्फथॅलीन द्रावणाची फवारणी करताच गडद गुलाबी रंगात उजळून निघाले. या कृतीतून आम्ल-आम्लारी दर्शक (acid-base indicator) या तत्त्वाचे सुंदर प्रदर्शन घडले आणि वैज्ञानिक संशोधनाच्या वृत्तीचे प्रतीकही अधोरेखित झाले. प्राचार्य सौ. जयती नरवणे यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. आपल्या प्रेरणादायी भाषणात श्री. अशोक रूपनर यांनी विद्यार्थ्यांना कुतूहल जोपासण्यास, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यास आणि प्रयोग व नाविन्यपूर्ण अध्ययनात सक्रिय सहभाग घेण्यास प्रोत्साहित केले. विज्ञान मंडळाच्या शिक्षिका सौ. स्वाती पाठक व सौ. प्रियंका केकाण यांनी या कार्यक्रमाचे उत्तम नियोजन केले.

**इंटरॅक्ट क्लबचे उद्घाटन**

दि. १८ जुलै २०२६ रोजी इंटरॅक्ट क्लबचा उद्घाटन समारंभ साजरा झाला. या समारंभाची सुरूवात प्राचार्य सौ. जयती नरवणे यांच्या स्वागतपर भाषणाने सुरू झाली. रोटरी क्लबच्या सहकार्याने इंटरॅक्ट क्लबच्या सदस्यांमार्फत राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती रोटेरियन कलेश नेरुरकर यांनी विद्यार्थ्यांना दिली. प्रमुख पाहुणे रोटेरियन प्रशांत देशमुख यांनी उपस्थितांना संबोधित केले आणि विद्यार्थ्यांना त्यांच्यातील सुप्त गुण शोधून ते विकसित करण्यासाठी प्रोत्साहन दिले. सौ. तृप्ती मुळे यांनी आभार प्रदर्शन केल्यानंतर या कार्यक्रमाची सांगता झाली.

**पहिल्या 'मुक्तांगण मॅथ क्लब'चे (गणित मंडळाचे) उद्घाटन 'मॅथ-ओ-मॅजिक' (MATH-O-MAGIC)**

दि. २१ जुलै २०२६ रोजी पहिल्या 'मुक्तांगण मॅथ क्लब'चे (गणित मंडळाचे) मोठ्या उत्साहात उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरूवात सौ. प्राची कोल्हटकर यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. विपुला अभ्यंकर (तज्ज्ञ मार्गदर्शक, इ. १ ली ते १० वी च्या गणित हस्तपुस्तिकांच्या लेखिका आणि गणित शिक्षण तज्ज्ञ) उपस्थित होत्या. सौ. विपुला अभ्यंकर यांच्या हस्ते 'मुक्तांगण मॅथ क्लब'चे अधिकृत उद्घाटन करण्यात आले. या क्लबला 'मॅथ-ओ-मॅजिक' (MATH-O-MAGIC) असे नाव देण्यात आले. क्लबच्या सदस्यांनी सोडवलेल्या एका रंजक शब्दकोड्याद्वारे या नावाचा उलगडा करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांचा परिचय सौ. याज्ञी आडकर यांनी करून दिला. प्रमुख पाहुण्यांचा सत्कार प्राचार्य सौ. जयती नरवणे यांच्या हस्ते करण्यात आला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सौ. विपुला अभ्यंकर यांनी यावर भर दिला की, 'गणित म्हणजे केवळ सूत्रे पाठ करणे नव्हे, तर तार्किक विचार

**कृपया पुढील वृत्त पृष्ठ क्र. २७ वर पहावे**

# कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, टेक्नॉलॉजी आणि मॅनेजमेंट, पुणे ९

**संचालक : श्री. सुनील रेडेकर**

**संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर**

**प्राचार्य : डॉ. संदीप पाटील**

**आंतरराष्ट्रीय स्तरावरील कॉन्फरन्सचे आयोजन**

महाविद्यालय दि. २८ ते ३० ऑक्टोबर २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय स्तरावरील सायन्स टेक्नॉलॉजी आणि मॅनेजमेंट प्रभागातील कॉन्फरन्स आयोजित करत आहे. या कॉन्फरन्स मध्ये निवड झालेले आर्टिकल स्प्रिजर नेचर आणि आयएसबीएन इंडियन बुक मध्ये प्रसारित होणार आहे.

**द एनजीओअकॅडेमिया समिटचे आयोजन**

दि. १० जुलै २०२६ रोजी महाविद्यालयात 'द एनजीओअकॅडेमिया समिट' हा एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला. 'द एनजीओअकॅडेमिया समिट' या परिषदेचे आयोजन पर्यावरणीय व सामाजिक हितासाठी स्वयंसेवी संस्था (एनजीओ) आणि शैक्षणिक संस्थांमधील सहकार्य अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने करण्यात आले. या परिषदेची संकल्पना 'समाज आणि पर्यावरणासाठी एकत्र : शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) साध्य करण्यासाठी स्वयंसेवी संस्था आणि शैक्षणिक संस्थांमधील सेतू' अशी होती. विविध स्वयंसेवी संस्थांचे २२ प्रतिनिधी, पीसीसीओई व मॉडर्न कॉलेज ऑफ सायन्सचे प्राध्यापक तसेच महाविद्यालयातील विभागप्रमुख व समन्वयक उपस्थित होते. पर्यावरण, आरोग्य व सामाजिक विकासासाठी स्वयंसेवी संस्था आणि शैक्षणिक क्षेत्र यांच्यातील सहकार्य, विद्यार्थी इंटर्नशिप, प्रकल्प व सामंजस्य करार (MoU) याबाबत सकारात्मक चर्चा झाली. शाश्वत विकास उद्दिष्टे (SDGs) साध्य करण्यासाठी संयुक्तपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. या अधिवेशनाच्या समन्वयिका प्रा. अर्चना मिराशी व डॉ. मीनाक्षी अत्रे या होत्या. प्राचार्य डॉ. संदीप पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम सुरळीतपणे पार पडला.

**अभिनंदनीय**

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. संदीप पाटील यांची राष्ट्रीय पातळीवरील IETE (इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअर्स) या व्यावसायिक संघटनेच्या पुणे शाखेच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. IETE च्या कोची-केरळ येथे झालेल्या गव्हर्निंग कौन्सिल सभेमध्ये राष्ट्रीय अध्यक्ष श्री. सुनील तसेच सर्व संचालक मंडळ यांच्यातर्फे प्रा. डॉ. संदीप पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

**प्राचार्य डॉ. संदीप पाटील यांचे महाविद्यालयाचे संचालक श्री. सुनील रेडेकर आणि प्रा. राजेंद्र कडुसकर, सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

**इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभाग**

**प्लेसमेंट**

अंतिम वर्षातील खालील विद्यार्थ्यांना माहे जुलै २०२६ मध्ये नोकरीची संधी मिळाली.

| विद्यार्थ्याचे नाव | कंपनीचे नाव | वार्षिक वेतन रुपये (लाख) |
|---|---|---|
| कु. ओम गुंड | Reliance | ७.५ |
| कु. किरण चव्हाण | Black and Veatch | ८.५ |

* डॉ. मंगेश ठाकरे आणि प्रा. राधा रांजेकर हे दि. १० जुलै २०२६ रोजी IEI पुणे लोकल चॅप्टर यांनी आयोजित केलेल्या 'ट्रान्सफॉर्मेशन ऑफ इंजिनिअरिंग एज्युकेशन फॉर विकसित भारत २०४७' या एक दिवसीय चर्चासत्रात उपस्थित होते.

* प्रा. प्रीती खत्री यांनी दि. १३ ते १७ जुलै २०२६ या कालावधीत 'AI in Research and Practice' या विषयावरील एक आठवड्याच्या प्राध्यापक विकास कार्यक्रमात सहभाग घेतला. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा सायन्स

विभाग आणि ISTE यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला होता.

❋ व्हिएतनाम येथील श्री. टिन डॉन यांनी महाविद्यालयामध्ये दोन महिन्यांची इंटर्नशिप पूर्ण केली. या कालावधीत त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), जनरेटिव्ह कृत्रिम बुद्धिमत्ता (Gen AI) आणि त्याच्या विविध अनुप्रयोगांचा अभ्यास एआय अँड डीएस विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. अपारे यांच्या मार्गदर्शनाखाली केला. या इंटर्नशिपचा एक महत्त्वपूर्ण परिणाम म्हणून श्री. टिएन यांनी ५० पानी संशोधन शोधनिबंध तयार केला असून तो आंतरराष्ट्रीय संशोधन नियतकालिकात प्रकाशित होणार आहे. दि. १३ जुलै २०२६ रोजी त्यांच्या निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी संचालक श्री. सुनील रेडेकर आणि प्रा. राजेंद्र कडुसकर, प्राचार्य डॉ. संदीप पाटील, डॉ. मनोज तारांबळे, डॉ. अपारे, सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

❋ डॉ. मंगेश ठाकरे, प्रा. उदय सरोदे, प्रा. राधा रांजेकर आणि प्रा. सुरेश यमला यांनी दि. १७ जुलै २०२६ रोजी गोखले एज्युकेशन सोसायटीचे आर. एच. सपत कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च या महाविद्यालयाने आयोजित केलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तृतीय वर्षाच्या प्रथम सत्राच्या नवीन अभ्यासक्रमासंदर्भात एक दिवसीय कार्यशाळेमध्ये नवीन विषयांसंदर्भात प्राध्यापकांना ऑनलाईन मार्गदर्शन केले.

❋ दि. २४ जुलै २०२६ रोजी स्कूल कनेक्ट या कार्यक्रमांतर्गत संस्थेच्या मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील सुमारे २०० विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रिकल व प्रिंटिंग अँड पॅकेजिंग विभागांना भेट दिली. त्यामध्ये डॉ. मंदार भवाळकर आणि प्रा. राधा रांजेकर यांनी विद्यार्थ्यांना विभागाची माहिती दिली.

❋ शुक्रवार दि. २४ जुलै २०२६ रोजी खालील प्रकल्पांना स्व. रवींद्र पी. कुलकर्णी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उत्कृष्ट प्रकल्पांचे रोख पारितोषिक देण्यात आले. या कार्यक्रमाला संस्थेच्यावतीने संचालक श्री. सुनील रेडेकर, प्र. प्राचार्य डॉ. मनमोहन भूमकर, विभागप्रमुख डॉ. मंगेश ठाकरे व श्री. भुवनेश कुलकर्णी कुटुंबीय उपस्थित होते.

**गट क्र. १ -** IoT Based Hybrid Inverter Design for Sustainable Solutions
सहभागी विद्यार्थी - कु. ओम गुंड, कु. तेजस माळोदे, कु. अभिषेक घोडके, कु. अंकिता बोराटे
मार्गदर्शक : प्रा. ओंकार एस. पावसकर

**गट क्र. २ -** Smart Multimachine Job Scheduler for Load
सहभागी विद्यार्थी - कु. श्रेयस जगताप, कु. सिद्धेश सुपुगडे, कु. कुणाल निमसे, कु. आदित्य सुरवसे
मार्गदर्शक : डॉ. मंदार पी. भवाळकर

❋ प्रा. प्रीती खत्री यांनी दि. २२ ते २९ जून २०२६ या कालावधीत 'Recent Innovations in Smart grid, Energy storage systems, Electric mobility and AI technologies' या विषयावरील एक आठवड्याच्या प्राध्यापक विकास कार्यक्रमात सहभाग घेतला. हा कार्यक्रम डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पिंपरी, पुणे येथील विद्युत अभियांत्रिकी विभागाने, ISTE आणि IEI यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला होता.

❋ शनिवार दि. २५ जुलै २०२६ रोजी द्वितीय, तृतीय आणि अंतिम वर्षामधील विद्यार्थ्यांना विभागाचे माजी विद्यार्थी कु. सिद्धेश सुपुगडे आणि कु. ओम गुंड यांनी 'अभियांत्रिकी करीअरची उद्दिष्ट्ये' या विषयावर मार्गदर्शन केले. प्रा. उदय सरोदे आणि विभागप्रमुख डॉ. मंगेश ठाकरे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले.

## इ ॲण्ड टी सी इंजिनिअरिंग विभाग

✲ विभागाने संशोधन व नवोपक्रम क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विभागप्रमुख डॉ. प्रसन्न गोपाळ शेटे यांच्या सहकार्याने विकसित करण्यात आलेल्या Secure Payment Controlling Device आणि Gamified Display Based Pediatrics Spirometer या दोन अभिनव डिझाइन्सना भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून डिझाइन नोंदणी (Design Registration) प्राप्त झाली आहे. या यशामध्ये डॉ. प्रसन्न गोपाळ शेटे तसेच विद्यार्थी संशोधकांचे मोलाचे योगदान लाभले असून, त्यांच्या संशोधनवृत्ती व नवोपक्रमशीलतेचा हा गौरव आहे. ही कामगिरी विभागातील संशोधन संस्कृती, नाविन्यपूर्ण विचारसरणी आणि बौद्धिक संपदा (IPR) निर्मितीबाबतची बांधिलकी अधोरेखित करते.

✲ विभागामार्फत मे आणि जून २०२६ दरम्यान ग्रामीण व शहरी भागातील विविध शैक्षणिक संस्थांना भेटी देण्यात आल्या. उच्च तंत्रशिक्षण, बहुविद्याशाखीय सामाजिक प्रकल्प, कौशल्य विकास, पर्यावरण, आरोग्य, भारतीय ज्ञान परंपरा (IKS), वैश्विक जीवन मूल्य (UHV) आणि ग्रामीण विकास यांसंदर्भात चर्चा करून सहयोगी उपक्रमांचे नियोजन करण्यात आले. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधारित प्रशिक्षण, योग व आरोग्य जनजागृती उपक्रम राबविण्याबाबत आणि महाविद्यालयामार्फत आयोजित 'महिला सक्षमीकरण आणि लिंग समानता २०२७' (Women's Empowerment and Gender Equity 2027) या आंतरराष्ट्रीय परिषदेत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले. या भेटीदरम्यान अनेक संस्थांमध्ये योग, आयुर्वेद व जीवनशैली याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमाचे नियोजन प्रा. रवींद्र पाटील आणि प्रा. दीप्ती वर्पे यांनी केले असून, कौशल्य विकास समन्वयक डॉ. वाय. बी. ठाकरे आणि विभागप्रमुख डॉ. पी. जी. शेटे यांचे मार्गदर्शन लाभले.

✲ विभागाच्या आर ॲंड डी टॉक सिरीज अंतर्गत तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी दि. १७ जुलै २०२६ रोजी माजी विद्यार्थी श्री. सिद्धार्थ चंद्रशेखरन (२००४ बॅच), सीनियर इंजिनिअरिंग मॅनेजर Hewlett Packard, बेंगळुरू यांच्याशी संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन आर ॲंड डी समन्वयक प्रा. टी. एस. खटावकर यांनी केले. या संवादादरम्यान श्री. सिद्धार्थ यांनी आपल्या तांत्रिक व व्यवस्थापकीय प्रवासातील अनुभव विद्यार्थ्यांशी शेअर केले. तसेच संदर्भग्रंथांचा अभ्यास, मूलभूत (कोर) तांत्रिक ज्ञानाचे महत्त्व, सहकार्यपूर्ण व सहानुभूतीपूर्ण शिक्षण तसेच उद्योगक्षेत्रासाठी स्वतःला सक्षम व सज्ज ठेवण्याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

✲ दि. १४ जुलै २०२६ रोजी 'Microcontrollers and Applications' या विषयावर एकदिवसीय प्राध्यापक अभिमुखता कार्यशाळेचे (Faculty Orientation Workshop) यशस्वी आयोजन करण्यात आले. एसपीपीयूच्या सुधारित टीई ईटीसी (२०२४ पॅटर्न) अभ्यासक्रमाच्या प्रभावी अध्यापनासाठी आयोजित या कार्यशाळेत ५१ प्राध्यापकांनी सहभाग घेतला. तसेच ८०५१ प्रोग्रामिंग, ARM७ आर्किटेक्चर, इंटरफेसिंग आणि आधुनिक अध्यापन पद्धतींवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. प्रा. व्ही. व्ही. सोवनी, प्रा. एस. के. बावकर आणि प्रा. डी. टी. वर्पे यांनी कार्यक्रमाचे प्रभावी आयोजन केले, तर सहभागी प्राध्यापकांनी कार्यशाळेच्या उत्कृष्ट संयोजनाचे आणि तांत्रिक सत्रांचे विशेष कौतुक केले.

## मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग

✲ प्रा. डॉ. अमी बारोट यांनी विद्यार्थी कु. आदित्य गावडे, कु. रुद्राक्ष केंकरे आणि कु. श्रेय भिसे यांच्यासह 'पेस्टिसाइड स्प्रेइंग रोव्हर' या पेटंटचे प्रकाशन केले आहे.

✲ प्रा. डॉ. शुभांगी गोंडाणे यांनी 'लॅबोरेटरी स्केल थर्मल ट्रीटमेंट डिव्हाइस' या पेटंटचे प्रकाशन केले आहे. हे पेटंट लहान आकाराच्या पदार्थांच्या नमुन्यांवर उष्णता

उपचार प्रक्रिया अचूकपणे नियंत्रित परिस्थितीत करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या नियंत्रित तापवणूक प्रणालीसाठी आहे.

* विभागप्रमुख प्रा. डॉ. मनमोहन भूमकर यांनी माहिती तंत्रज्ञान विभागातील प्रा. शुभांगी देशपांडे आणि विद्यार्थी कु. आर्यन कानसे, कु. आविष्कार दरेकर, कु. श्रीवल्लभ मोहोरीर, कु. आदित्य निकम, कु. ओम खराडकर, कु. मानसी वाघ आणि कु. गायत्री वझे यांच्यासह आंतरशाखीय प्रकल्प 'स्मार्ट डस्टबिन' या विषयावर पेटंट प्रकाशित केले आहे.

* महाविद्यालयाच्या एएसएम विद्यार्थी क्लबने मेसाच्या सहकार्याने यांत्रिकी अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसाठी दि. ९ ते ११ जुलै २०२६ दरम्यान जीडी अँड टी आणि सीएमएम अनुप्रयोगांवरील तीन दिवसीय कौशल्य विकास कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमाचे उद्घाटन संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, प्राचार्य प्रा. डॉ. एस. आर. पाटील आणि यांत्रिकी विभागप्रमुख प्रा. डॉ. एम. एम. भूमकर यांच्या उपस्थितीत झाले. अॅक्युरेट गेजिंग अँड इन्स्ट्रुमेंट प्रा. लि., पुणे येथील वरिष्ठ व्यवस्थापक श्री. ए. वाय. मोमीन यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रा. संकेत एस. चिक्षे यांच्या आयोजनातून विद्यार्थ्यांना जीडी अँड टी, सीएमएम अनुप्रयोग, अभियांत्रिकी रेखाचित्रांचे आकलन आणि औद्योगिक तपासणी तंत्रांचे व्यावहारिक ज्ञान मिळाले.

* विभागाने अॅलॅक्रिटी इंजिनिअरिंग सर्व्हिसेस प्रा. लि., पुणे यांच्या सहकार्याने आपल्या ३डी प्रिंटिंग एक्सलन्स सेंटरमार्फत एक महिन्याच्या ३डी प्रिंटिंग इंटर्नशिप कार्यक्रमाची सुरूवात केली. प्रा. संकेत एस. चिक्षे यांच्या मार्गदर्शनाखाली व ॲमिसन इंजिनिअरिंग, पुणे आणि एएसएम इंटरनॅशनल पुणे चॅप्टर यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना ३डी प्रिंटिंग, ३डी स्कॅनिंग आणि औद्योगिक अनुप्रयोगांचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जात आहे.

* विभागातील वर्कशॉप कारपेंटर श्री. दत्तात्रय नारायण पांचाळ यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्ये डिप्लोमा पूर्ण केला आहे.

## कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग

### पेटंट

'महिला सक्षमीकरणासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर (AI) आधारित, विविध मर्यादांचे भान राखणारी नोकरी शिफारस प्रणाली आणि पद्धत' या शीर्षकाखाली भारतीय पेटंट मंजूर झाले आहे. प्रकाशन क्रमांक : IN५९३०१७ B१ (दि. २२/६/२०२६). हे पेटंट नीता सुनील शिरसाट (IT), उर्मिला महादेव कळशेट्टी (Computer) आणि श्रीमती विजयालक्ष्मी अभिजित कानडे (AI&DS) यांनी मिळवले आहे.

### माजी विद्यार्थ्यांद्वारे प्रोजेक्ट ओरिएंटेशन

विभागाने अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी दि. १८ जुलै २०२६ रोजी 'प्रोजेक्ट ओरिएंटेशन II' (माजी विद्यार्थ्यांद्वारे प्रकल्प मार्गदर्शन सत्र) आयोजित केले होते. यामध्ये अंतिम वर्ष २०२५-२६ बॅचच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रकल्पाचा संपूर्ण अनुभव सांगितला आणि प्रकल्पाच्या विकास प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. कु. कृतिका सुर्वसे, कु. दीप्ती पाटील, श्री. अनुराग मुळे, कु. ईशिता देशपांडे, श्री. जय जोशी आणि श्री. ऋषिकेश पाटील या ६ विद्यार्थ्यांनी त्यांचे अनुभव सादर केले. या सत्राचे संयोजन विभागस्तरीय प्रकल्प समन्वयक प्रा. श्रीमती एम. एस. पोकळे यांनी केले.

### प्रशिक्षण आणि प्लेसमेंट उपक्रम उद्योग-सज्जता कार्यक्रम

अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी 'PHN टेक्नॉलॉजी'च्या सहकार्याने दि. ८ ते १७ जुलै २०२६ या कालावधीत १० दिवसांचा 'उद्योग-सज्जता प्रशिक्षण कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षणात सॉफ्ट स्किल्स, अभियोग्यता आणि मुख्य तांत्रिक विषयांवर विशेष भर देण्यात आला. या उपक्रमात ७२ विद्यार्थ्यांनी यशस्वीरित्या सहभाग नोंदवला. संस्थेच्या 'प्रशिक्षण आणि प्लेसमेंट विभाग' आणि प्रा. डी. डी. सपकाळ यांच्या समन्वयाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

✲ प्रा. एस. एच. पाटील, प्रा. एम. एस. पोकळे आणि प्रा. पी. ए. माने यांनी आमच्या संस्थेच्या 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स' विभागातर्फे दि. १३ ते १७ जुलै २०२६ या कालावधीत आयोजित (संशोधन आणि प्रत्यक्ष कार्यातील कृत्रिम बुद्धिमत्ता) या विषयावरील ISTE - प्रायोजित (स्व-वित्तपोषित) एका आठवड्याच्या 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम'मध्ये सहभाग घेतला.

✲ प्रा. बी. सी. जुल्मे, प्रा. ए. एम. भडगाळे आणि प्रा. ए. डी. तवलारे यांनी दि. १३ ते १७ जुलै २०२६ या कालावधीत, आमच्या संस्थेच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने SAGIFY आणि EPIGNOSIS यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या 'कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित प्राध्यापक परिवर्तन कार्यक्रम' या पाच-दिवसीय 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम'मध्ये सहभाग घेतला.

## प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभाग

✲ युनिव्हर्सल ह्युमन व्हॅल्यूज (UHV) स्वयंसेवकांची वार्षिक राष्ट्रीय बैठक दि. २ ते ४ जुलै २०२६ या कालावधीत राज आनंद संस्थान, आनंद (मध्य प्रदेश) येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत डॉ. श्रीलेखा घट्टे, प्रा. एम. एस. कोरे आणि प्रा. श्रीमती अर्चना मिराशी या तीन प्राध्यापकांनी सहभाग घेतला. त्यांनी उच्च शिक्षण, शालेय शिक्षण आणि 'टीम डेव्हलपमेंट' (संघ विकास) यांसारख्या विविध शैक्षणिक स्तरांवर UHV ची अंमलबजावणी अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने सुरू असलेले उपक्रम आणि भविष्यातील योजनांची माहिती सादर केली.

✲ 'नोडल सेंटर' म्हणून, प्रत्येक प्राध्यापकाने विविध UHV उपक्रम आणि राष्ट्रीय प्रकल्पांमधील आपले वैयक्तिक योगदान सादर केले, जे खालीलप्रमाणे आहे :

१) डॉ. श्रीलेखा घट्टे - विद्यार्थी कार्यशाळा आणि 'मायनर डिग्री' अभ्यासक्रम निर्मितीसाठी मराठी अनुवाद;

२) प्रा. एम. एस. कोरे - UHV समुपदेशन समिती आणि अंमलबजावणी समिती;

३) प्रा. श्रीमती अर्चना मिराशी - UHV शालेय शिक्षण उपक्रमांतर्गत, शाळांमध्ये UHV शिकवण्यासाठी 'कॉमिक बुक' संकल्पनेचा परिचय आणि UHV अंमलबजावणी समिती.

✲ डॉ. डी. वाय. पाटील प्रतिष्ठानच्या कोल्हापूर (सालोखेनगर) येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सिव्हिल इंजिनिअरिंग विभागातर्फे दि. १३ ते १७ जुलै २०२६ या कालावधीत 'अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानातील कृत्रिम बुद्धिमत्तेचा (Artificial Intelligence ) वापर' या विषयावर - ISTE मान्यताप्राप्त पाच दिवसीय 'फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम' आयोजित करण्यात आला होता. प्रा. श्रीमती वर्षा सामंत यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला आणि तो यशस्वीरित्या पूर्ण केला.

✲ विभागाने दि. १३ ते १७ जुलै २०२६ या कालावधीत 'एआय-पावर्ड फॅकल्टी ट्रान्सफॉर्मेशन प्रोग्राम' या विषयावर एक आठवड्याचा प्राध्यापक विकास कार्यक्रम आयोजित केला होता. आमच्या विभागातील डॉ. एस. जी. घट्टे आणि प्रा. व्ही. एस. सामंत या दोन प्राध्यापकांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला आणि तो यशस्वीरित्या पूर्ण केला.

या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम दरम्यान विविध उपक्रम आणि असाइनमेंट्स राबवण्यात आल्या. कार्यक्रमातील कामाच्या आधारे आणि उपक्रम वेळेत पूर्ण केल्याबद्दल सहभागींना पुरस्कार देण्यात आले; यामध्ये विभागातील प्रा. श्रीमती व्ही. एस. सामंत यांना या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम दरम्यान केलेल्या उत्कृष्ट कार्यासाठी सन्मानित करण्यात आले.

## ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभाग

✲ प्लेसमेंट विभागामध्ये मागील महिन्यात प्रतिष्ठित कंपन्यांमध्ये अंतिम वर्षांच्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी मिळाल्या. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील कंपन्यांचा सहभाग होता - ब्लॅक अँड विच, टीसीएस,

CG (क्रॉम्प्टन ग्रीव्हज) पावर, के पी आय टेक सर्विसेस, इंट्राटा, ARAI, हाय कूल, आय एफ आय इत्यादी. तसेच ॲटलस कॉप्को, टोयोटा किर्लोस्कर, पीएमटी मशीन लिमिटेड या कंपन्यांचे निकाल येणे अपेक्षित आहे.

✼ दि. ८ जुलै २०२६ पासून PHN तर्फे इंडस्ट्री रेडिनेस ट्रेनिंग प्रोग्राम ज्यामध्ये ॲप्टीट्युड टेस्ट, कम्युनिकेशन स्किल्स व टेक्निकल यांच्या पूर्व तयारीसाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करण्यात आली होती.

✼ गेल्या काही दिवसांमध्ये महाविद्यालयाने पी एच एन, मॅजिक बस, फॉर्च्यून क्लाऊड, आयडीपी एज्युकेशन प्रा. लि., एरफ्लोग कौन्सिलिंग सर्व्हिसेस, स्मार्ट कुकीज, एज्यु प्लस नाऊ, क्रेडीला फायनान्शिअल सर्व्हिसेस या संस्थांबरोबर सामंजस्य करार केले. ज्यांच्या अंतर्गत विद्यार्थ्यांना प्रशिक्षण, उच्च शिक्षण मार्गदर्शन व अर्थसहाय्य, इंटर्नशिप, नोकरी सहाय्य व कॉलेजमध्ये ड्रोन लॅब ची स्थापना यांचा समावेश आहे.

✼ ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफिसर श्री. अविनाश पोरे, सर्व विभागांचे ट्रेनिंग प्लेसमेंटचे शिक्षक प्रतिनिधी, डीन इंडस्ट्री रिलेशन्स डॉ. सुनील टी गायकवाड यांनी वरील कार्यक्रमांचे आयोजन केले. तसेच सर्व कार्यक्रमांना सर्व विभाग प्रमुख, प्राचार्य डॉ. संदीप पाटील, संचालक श्री. सुनील रेडेकर व श्री. राजेंद्र कडुसकर यांचे मार्गदर्शन लाभले.

**एमबीए विभाग**

### पुणे आणि सिंगापूरच्या नान्यांग इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट यांच्यात धोरणात्मक सामंजस्य करार

आंतरराष्ट्रीय शैक्षणिक ठशाचा विस्तार करण्याच्या दृष्टीने एक मोठे पाऊल टाकत महाविद्यालयाने सिंगापूरमधील नामांकित 'नान्यांग इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट' (NIM) बरोबर दि. ६ जुलै २०२६ रोजी अधिकृतपणे एका सामंजस्य करारावर (MoU) स्वाक्षरी केली आहे. हा धोरणात्मक करार जागतिक शैक्षणिक सहकार्य आणि अत्याधुनिक संशोधनाच्या क्षेत्रात दोन्ही संस्थांसाठी प्रगतीचे नवे मार्ग खुले करणार आहे. ✼✼✼


## संस्थेस देणगी पाठविण्यासंबंधीची माहिती

**या देणगीवर आयकर खात्याच्या कलम ८० जी नुसार आयकरात ५०% सवलत मिळते.**

**The details of our bank account are as follows :**

| | |
|---|---|
| Bank A/c Name | : **Pune Vidyarthi Griha** |
| Bank Name | : **Bank of Baroda** |
| Branch | : **Sadashiv Peth, Pune 411030** |
| Saving A/c No. | : **04500100009842** |
| RTGS/NEFT/ IFSC CODE | : **BARB0SADASH** |
| | **The fifth character is numeric 'zero'.** |
| Swift Code | : **BARBIN BBPCB** |
| MICR Code | : **411012009** |

**बँकेमध्ये देणगी पाठविल्यानंतर रकमेव्यतिरिक्त नाव, पत्ता असा कोणताही संदर्भ संस्थेस प्राप्त होत नाही त्यामुळे कृपया आपण वरील खात्यावर देणगी पाठविल्यानंतर खालील फोन नं. वर किंवा ई मेलवर सविस्तर माहितीसाठी संपर्क करून कळवावे. फोन नं. - ०२० २४४७०९२७, २४४७०५७३ ई मेल :** pvgheadoffice@gmail.com

## विद्याभवन-घाटकोपर, मुंबई शाखा

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

## विद्याभवन माध्यमिक मराठी व कनिष्ठ महाविद्यालय

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**प्राचार्य : श्रीमती योगिनी राजेंद्र पोतदार**

### NMMS शिष्यवृत्ती परीक्षा २०२५ - २६

भारत सरकारतर्फे इ. ८ वी तील राष्ट्रीय आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या NMMS परीक्षा २०२५ - २६ या शिष्यवृत्ती परीक्षेत विभागातील ८ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळवून विद्याभवनच्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे. या शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांना शासनातर्फे इ. ९ वी ते इ. १२ वी पर्यंत दरवर्षी रु. १२,०००/- या प्रमाणे एकूण रु. ४८,०००/- शिष्यवृत्ती मिळते.

NMMS परीक्षा २०२५ - २६ शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे -

१) कु. कुलाबकर संस्कृती निलेश (SBC Category मधून मुंबई उत्तर विभागातून प्रथम)

२) कु. केदार ध्रुव अनिल (NTD Category मधून मुंबई उत्तर विभागातून प्रथम)

३) कु. सुपे आराध्या संदीप (ST Category मधून मुंबई उत्तर विभागातून द्वितीय)

४) कु. चौधरी आर्श भटू

५) कु. पोळ विधीशा विशाल

६) कु. साळी निसर्गा कुमार

७) कु. नेहरे अर्णव गोरक्ष

८) कु. महाडिक रुद्र महेश

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !

### आंतरराष्ट्रीय योग दिन

दि. २० जून २०२६ रोजी प्रशालेत 'आंतरराष्ट्रीय योग दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त प्रत्येक वर्गामध्ये विद्यार्थ्यांनी विविध योगासनांची प्रात्यक्षिके सादर केली.

तसेच यावेळी योगप्रशिक्षक श्रीमती जयश्री करंजकर, श्रीमती सारिका बर्मन, श्रीमती रुपाली नांगरे, श्रीमती त्रिशा करंजकर यांना प्रशालेत आमंत्रित केले होते. त्यांनी प्रशालेच्या मैदानावर विद्यार्थ्यांना विविध योगासनांची प्रात्यक्षिके करून दाखवली. त्यानुसार इ. ७ वी च्या विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी गायत्रीमंत्र, योग प्रार्थना म्हणून योगासनांना सुरूवात केली. ताडासन, वृक्षासन, त्रिकोणासन अशी विविध योगासने विद्यार्थ्यांना करून दाखवली. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना योग - दिनाचे महत्त्व, योगासनाचे महत्त्व सांगून श्वासाचे व्यायाम करून घेतले.

या प्रसंगी प्राचार्य सौ. योगिनी पोतदार, उपप्राचार्य सौ. ज्योती देसाई, इंग्रजी माध्यमाच्या प्र. मुख्याध्यापिका श्रीमती श्रीलता नायर, पर्यवेक्षक श्री. पवार आणि समन्वयिका सौ. सरला नरेंद्रन व शिक्षक उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांना योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या. अखेर मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रम संपन्न झाला.

### पालकसभा २०२६ - २७

दि. २२ ते २९ जून २०२६ या कालावधीत इ. ५ वी ते १० वी या वर्गांच्या पालकसभा घेण्यात आल्या.

प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार यांनी इ. १० वी च्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबाबत मार्गदर्शन केले. शाळेची शिस्त, शाळेत राबवत असलेले विविध उपक्रम, नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी सूचना दिल्या.

यानंतर वर्गशिक्षकांनी व्हीबी ॲप स्कॉलरशिप परीक्षा, स्पर्धा परीक्षा, शिस्त, स्वच्छता, विद्यार्थ्यांची उपस्थिती, अभ्यास, दप्तराचे ओझे, दैनंदिन गणवेश, क्रीडास्पर्धा, उपक्रम यांची माहिती दिली. उपप्राचार्य

सौ. ज्योती देसाई यांनी इ. १० व  इ. १२ वी निकाल, NMMS शिष्यवृत्तीच्या निकालाबाबत माहिती दिली.

शेवटी इयत्तेनुसार प्रत्येक तुकडीतून एक अशी पालक प्रतिनिधींची निवड करण्यात आली. प्राचार्य सौ. योगिनी पोतदार यांनी उपस्थित सर्व पालकांचे हार्दिक स्वागत केले आणि निवडलेल्या प्रतिनिधींचे अभिनंदन केले.

**जागतिक नशामुक्ती दिन अंतर्गत ड्रग फ्री मुंबई अभियान**

दरवर्षी जगभरात २६ जून हा दिवस 'जागतिक नशामुक्ती दिन' म्हणून साजरा केला जातो. शुक्रवार दि. २६ जून २०२६ रोजी मोहरमनिमित्त सुट्टी असल्यामुळे गुरूवार दि. २५ जून २०२६ रोजी 'जागतिक नशामुक्ती दिन' साजरा करण्यात आला.

सर्व वर्गातील विद्यार्थ्यांनी शिक्षकांसह नशामुक्तीची प्रतिज्ञा घेतली. इ. ७ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी नशामुक्ती सुखी जीवनाचा संदेश देणारी, व्यसनांचे दुष्परिणाम दर्शवणारी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली. इ. ८ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांनी 'Say no to Drugs' 'मादक द्रव्याची गोळी, सुखी जीवनाची होळी' असे संदेश देणारे विविध पोस्टर्स तयार केले होते.

शिक्षकांनी प्रत्येक वर्गात नशेचे / व्यसनांचे दुष्परिणाम विद्यार्थ्यांना सांगितले आणि आरोग्यदायी सुसंस्कृत जीवन जगण्याची प्रेरणा दिली. जागतिक नशामुक्ती दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना घरातील सदस्यांना, मित्रांना व्यसनांचे दुष्परिणाम सांगून त्यापासून दूर राहण्यासाठी त्यांना जागरूक करण्याचे आवाहन केले.

**परदेशी पाहुण्या शिक्षकांची (मारिया अँगला) प्रशालेस भेट**

दि. २९ जून २०२६ रोजी मारिया अँगला या परदेशी पाहुण्यांनी प्रशालेस भेट दिली. प्रशालेच्या प्रवेशद्वारावरच विद्यार्थ्यांनी आणि प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार, उपप्राचार्य सौ. ज्योती देसाई आणि इतर सहकारी शिक्षक यांनी मारिया यांचे औक्षण करून स्वागत केले. मारिया या मूळच्या फिलिपिन्स येथील असून सध्या वॉशिंग्टन डी. सी. मधे शिक्षिका आहेत. त्या द्विभाषिक, वेगवेगळ्या पार्श्वभूमीच्या तसेच विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसोबत कार्य करतात. ग्लोबल टीचर अवॉर्ड विजेते श्री. रणजित देसले सर यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी भारतातील त्यांच्या अध्यापन पद्धतीचा प्रसार करण्यासाठी विद्याभवन शाळेची निवड केली. मारिया अँगला यांनी प्रथम प्रशालेतील विद्यार्थ्यांची वर्गात जाऊन प्रत्यक्ष भेट घेतली आणि संपूर्ण प्रशालेची पाहणी केली.

त्यानंतर सेमिनार हॉलमध्ये आयोजित कार्यक्रम प्रसंगी प्राथमिक इंग्रजी विभागाच्या मुख्याध्यापिका अनघा यांनी मारिया अँगला यांची सविस्तर माहिती उपस्थितांना दिली. प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार, उपप्राचार्य सौ. ज्योती देसाई आणि समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन यांच्या उपस्थितीत मारिया अँगला यांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी ४५ मिनिटांच्या सादरीकरणाद्वारे शिक्षक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधला. शिक्षक व विद्यार्थ्यांनी दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाचे त्यांनी कौतुक केले. भविष्यात पुन्हा शाळेला भेट देऊन शिक्षकांना प्रशिक्षण देण्याची इच्छाही त्यांनी व्यक्त केली.

मारिया अँगला यांनी विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन करताना 'ॲक्सेस सिस्टीम' ची ओळख करून दिली. तसेच Literacy, framework, Clarify, chunk, Engage, Support, synthesize या विषयी विद्यार्थी व शिक्षकांशी प्रत्यक्ष ॲक्टिव्हिटी घेऊन संवाद साधला. श्रीमती अनघा सावंत यांनी मारिया अँगला यांचे आभार मानले. विद्यार्थ्यांनी मारिया अँगला यांचेबरोबर छायाचित्र काढले आणि त्यांचेशी संवादही साधला.

**सेवा निवृत्ती कार्यक्रम संपन्न**

मंगळवार दि. ३० जानेवारी २०२६ रोजी प्रशालेच्या सेमिनार हॉलमध्ये सकाळी १० ते १२.३०

या वेळेत उपप्राचार्य सौ. ज्योती देसाई व सहाय्यक शिक्षक श्री. पदमाकर शिंगटे यांच्या सेवानिवृत्तीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे तसेच माजी कार्याध्यक्ष श्री. के. एन. शिरकांडे व सौ. कल्पना शिरकांडे, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार, प्र. मुख्याध्यापिका श्रीमती श्रीलता नायर, इतर सर्व विभागांचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच देसाई व शिंगटे कुटुंबीय उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती संगीता साळी यांनी केले. शिक्षकांनी उत्सवमूर्ती विषयी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच नातेवाईकांनी आपल्या कौटुंबिक सदस्या विषयी आपली मते मांडली. प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. आजी व माजी कार्याध्यक्षांच्या हस्ते सौ. ज्योती देसाई आणि श्री. पदमाकर शिंगटे यांचा सत्कार करण्यात आला. कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी त्यांना निवृत्तीनंतरच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. शिक्षिका श्रीमती संगीता साळी यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

**इयत्ता ५ वी शिष्यवृत्ती परीक्षा २०२५ - २६**

शैक्षणिक वर्ष फेब्रुवारी २०२५ - २६ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इ. ५ वी चे २२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यापैकी १७ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त केली. शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी पुढील प्रमाणे -

| विद्यार्थ्याचे नाव | गुणवत्ता यादी क्रमांक | प्राप्त गुण |
|---|---|---|
| कु. चिखले विराज | K-४७ | २२२ |
| कु. गायकवाड रितू | K-१८६ | २०२ |
| कु. ढवळे हर्ष | K-४३१ | १८६ |
| कु. करगोंडे अर्णव | K-५३४ | १८२ |
| कु. शेणवी श्लोक | K- ७०८ | १७६ |
| कु. पळसकर श्रेयस | K- ७०९ | १७६ |
| कु. खरात संस्कार | K-७१३ | १७६ |
| कु. हुले नीळकंठ | K-९५८ | १७० |
| कु. करगोंडे प्रणव | K - ९५९ | १७० |
| कु. नागटिळक अभिराज | K - १०३४ | १६८ |
| कु. आवटे भार्गव | K - ११४३ | १६६ |
| कु. बंडकुळे निखील | K - १२६३ | १६४ |
| कु. बावदाणे आर्यन | K - १३९५ | १६२ |
| कु. घुगे गौरी | K - १३९७ | १६२ |
| कु. तारगळे साहिल | K - १५४० | १६० |
| कु. सानप तेजस | K - १६५८ | १५८ |
| कु. पाटील श्रीधर | K - १६६३ | १५८ |

विशेष म्हणजे शाळेची परंपरा अबाधित राखत यंदाच्या वर्षीही शाळेची गुणवत्ता व दर्जा कायम ठेवून शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार विद्याभवन प्रशाला संपूर्ण घाटकोपर विभागातून मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रथम क्रमांकाची मानकरी ठरली आहे.

विशेष गोष्ट म्हणजे कु. विराज सतीश चिखले याने २२२ गुण मिळवून गुणवत्ता यादीत घाटकोपर मधून चौथा क्रमांक आणि उत्तर विभागातून सोळावा क्रमांक मिळवून दुहेरी यश मिळवले आहे.

**पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ८ वी - २०२६**

फेब्रुवारी २०२५ - २६ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इ. ८ वी चे १५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यापैकी १३ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरले आहेत. शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी पुढील प्रमाणे -

| विद्यार्थ्याचे नाव | गुणवत्ता यादी क्रमांक | प्राप्त गुण |
|---|---|---|
| कु. नेहरे अर्णव | K - १७ | २५२ |
| कु. पाटील आसावरी | K - २१ | २५० |
| कु. पाटील जयदीप | K - १९६ | २०४ |
| कु. सरगर संस्कृती | K - २०८ | २०२ |
| कु. माने सोहम नितीन | K - २८८ | १९४ |
| कु. महाडिक रूद्र | K - ३२३ | १९० |

| | | |
|---|---|---|
| कु. मुरूडकर ओवी | K - ४६९ | १८० |
| कु. आव्हाड सान्वी | K - ५५३ | १७६ |
| कु. शिवगण जान्हवी | K - ५५४ | १७६ |
| कु. केदार वैष्णवी | K - ७०४ | १७० |
| कु. शिंदे सिया कृष्णा | K - ७७० | १६८ |
| कु. खरात ईश्वरी | K - १२६४ | १५६ |
| कु. दुधाळ आदित्य | K - १२६८ | १५६ |

विद्यार्थी कु. नेहरे अर्णव गोरक्ष याने २५२ गुण मिळवून गुणवत्ता यादीत घाटकोपर मधून पहिला आणि मुंबई उत्तर विभागातून दुसरा क्रमांक प्राप्त केला आहे. आणि कु. पाटील आसावरी अमोल हिने २५० गुण मिळवून घाटकोपर मधून दुसरा तर मुंबई उत्तर विभागातून तिसरा क्रमांक प्राप्त केला आहे.

शिष्यवृत्ती मिळवून गुणवत्ता यादीत झळकलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार आणि शिक्षकवृंद यांच्यातर्फे हार्दिक अभिनंदन !

**जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त पोस्टर स्पर्धेचे आयोजन**

आज दि. ११ जुलै २०२६ रोजी जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त सकाळी ८.०० वा. प्रशालेच्या अप्पासाहेब गरगटे सभागृहात 'इको क्लब' आणि 'निसर्ग मंडळ' यांच्या संयुक्त विद्यमाने लोकसंख्या वाढ आणि नियंत्रण या विषयावर आधारित पोस्टर स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत इ. ७ वी व इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धेचे परीक्षण श्री. अर्जुन मस्के यांनी केले. प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार यांनी विद्यार्थ्यांनी काढलेल्या पोस्टरचे, पोस्टर तयार करण्याच्या कलेचे कौतुक केले.

**सलाम बॉम्बे फाऊंडेशन**

मंगळवार दि. १४ जुलै २०२६ रोजी सलाम बॉम्बे फाऊंडेशन व प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने आप्पासाहेब गरगटे सभागृहात इ. ८ वी व ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'टोबॅको कंट्रोल' या विषयावरील चित्रफित व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

रेश्मा कांबळे यांनी या व्याख्यानामध्ये तंबाखू सेवनाने होणारे तोटे विद्यार्थ्यांना सांगून विद्यार्थ्यांनी कसे जागरूक रहावे याचे मार्गदर्शन केले. या प्रसंगी प्राचार्य श्रीमती योगिनी पोतदार, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन श्री. अर्जुन मस्के यांनी केले.

## विद्याभवन प्राथमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापक : श्री. गणेश सुदाम कणसे**

**जागतिक योग दिन**

दि. २१ जून २०२६ रोजी जागतिक योग दिनानिमित्त प्रशालेत योग वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. पतंजली योग पीठाचे मार्गदर्शक श्री. हरीजी व श्रीमती संगीता मॅडम यांनी इ. १ ली ते ४ थी च्या सर्व विद्यार्थ्यांना योग साधनेची माहिती दिली. योगासने करण्याचे फायदे समजावून सांगितले. तसेच सर्व विद्यार्थ्यांकडून विविध योगासने करून घेतली. मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांनी उपस्थित मार्गदर्शकांचे आभार मानले.

**पालक सभा**

शैक्षणिक वर्ष २०२६ - २७ साठी दि. २५ जून २०२६ व २९ जून २०२६ रोजी अनुक्रमे इ. ३ री व इ. ४ थी तसेच इ. १ ली व इ. २ री च्या पालकांच्या पालकसभा घेण्यात आल्या. वर्षभरात प्रशालेत घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची तसेच अभ्यासक्रमांची व परीक्षा पध्दतीची पालकांना माहिती दिली. अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांनी स्पोर्ट्स, कला व गायन - वादन यांसारख्या शाळेत चालणाऱ्या उपक्रमांतही सहभागी व्हावे यासाठी मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांनी उपस्थित सर्व पालकांचे आभार मानले.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापिका : श्रीमती अनघा संतोष सावंत**

### वार्षिक सर्वसाधारण सभा

दि. २२ व २३ जून २०२६ रोजी पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा डिग्री कॉलेज च्या सभागृहात पार पडली. मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत यांनी येऊ घातलेल्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी आपापल्या परीने योगदान देऊन विविध स्पर्धांमध्ये सहभागी होऊन पाल्यांच्या सर्वांगीण विकासात मदत करावी असे आवाहन केले. सर्वसाधारण सूचना दिल्यानंतर मुख्याध्यापिका श्रीमती सावंत यांनी शाळेत सुरू झालेल्या संगीत अकादमी बद्दल पालकांना माहिती दिली व आवडत्या क्षेत्रात विद्यार्थ्यांनी पारंगत व्हावे असा मनोदय व्यक्त केला. खेळांचे विविध प्रकार देखील दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्या भवनच्या मैदानात शालेय वेळात घेतले जाणार आहेत. फुटबॉल, क्रिकेट, कराटे, जिम्नॅस्टिक्स, बास्केटबॉल अशा आवडत्या खेळांमध्ये विद्यार्थ्यानी सहभाग घ्यावा असे आवाहन केले. सगळ्या शिक्षकांची ओळख करून दिल्यानंतर त्यांनी विद्याभवन शैक्षणिक संकुलाचा चढता आलेख पालकांसमोर मांडला आणि याही वर्षी इयत्ता दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली असे अभिमानाने सांगितले. येत्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण सुलभ व्हावे यासाठी पुणे विद्यार्थी गृह संस्थेने प्रत्येक वर्गात स्मार्ट डिजिटल बोर्ड उपलब्ध करून दिलेले आहेत जेणेकरून विद्यार्थी - शिक्षक सुसंवाद अतिशय रंजक आणि प्रभावीपणे होण्यास मदत होणार आहे. शिक्षकांची कुशाग्र बुद्धी आणि त्याला मिळणारी तंत्रज्ञानाची जोड यामुळे विद्यार्थ्यांसाठी शिक्षण खरोखरच आनंददायी होणार आहे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. विद्यार्थ्यांनी शाळेच्या आवारात पाळावयाचे नियम आणि पालकांसाठी घालून दिलेल्या नियमावलीला त्यांनी अधोरेखित केले. इ. १ली ते ४थीच्या सर्व वर्गांची पहिली वार्षिक सभा पार पडली. यासाठी पाऊस असताना देखील बरेचसे पालक उपस्थित होते. उपस्थित पालकांच्या शंकांचे निरसनही श्रीमती अनघा सावंत यांनी केले.

### आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ एक अविस्मरणीय अनुभव

आंतरराष्ट्रीय योग दिन २०२६ निमित्त इ. ३री आणि ४थीच्या सगळ्या विद्यार्थ्यांनी आमच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या उत्साहवर्धक आणि प्रेरणादायी योग सत्रात मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. आदरणीय वरिष्ठ शिक्षिका सौ. रेश्मा गणेश पैलकर यांच्या कुशल, समर्पित आणि प्रभावी मार्गदर्शनाखाली तसेच 'घंटाळी मित्र मंडळ योग संस्थान', ठाणे येथील उत्साही स्वयंसेवकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांनी योगाचे प्रात्यक्षिक व सैद्धांतिक महत्त्व अनुभवले. या सत्रामध्ये चक्की चालन, श्वसनाचे विविध प्रकार, भ्रामरी प्राणायाम, सूर्यनमस्कार, एरोप्लेन आसन तसेच इतर अनेक योगासनांचा समावेश होता. यामुळे विद्यार्थ्यांना शारीरिक तंदुरुस्ती, एकाग्रता, मानसिक शांतता आणि शिस्तबद्ध जीवनशैलीचे महत्त्व समजले. योग स्वयंसेवकांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत आणि सौ. रेश्मा पैलकर यांनी प्रत्येक आसनाचे सुंदर प्रात्यक्षिक सादर केले आणि विद्यार्थ्यांनीही ते अत्यंत उत्साहाने व शिस्तीने आत्मसात केले. एकाच वेळी विद्यार्थ्यांना संयम, अचूकता आणि सकारात्मकतेने मार्गदर्शन करणे ही खरोखरच कौतुकास्पद बाब आहे. या सत्रातील सर्वात विशेष बाब म्हणजे विद्यार्थ्यांनी दिलेले आश्वासन. ते आपल्या पालकांसमवेत दररोज योगाभ्यास करतील आणि योगाला आपल्या निरोगी जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनवतील. 'योग हा केवळ व्यायाम नसून, तो स्वतःकडून स्वतःकडे जाणारा आत्मप्रवास आहे.' ही जाणीव विद्यार्थ्यांमध्ये या कार्यक्रमामुळे काही प्रमाणात निर्माण झाली.

### अमली पदार्थांविषयी जनजागृती

दि. २५ जून २०२६ रोजी इ. ३री व ४थीच्या विद्यार्थ्यांसाठी 'अमली पदार्थांविषयी जनजागृती' या विषयावर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये अमली पदार्थांच्या हानिकारक परिणामांविषयी जागरूकता निर्माण करणे आणि त्यांनी निरोगी व सुरक्षित जीवनशैलीचा स्वीकार करावा यासाठी त्यांना प्रोत्साहित करणे हा होता. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत रंगीत पोस्टर्स तयार केली तसेच अमली पदार्थांपासून दूर राहण्याचा संदेश देणारे सोपे व प्रभावी संदेश लिहिले. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या सेवनामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो, मेंदूवर त्याचा वाईट परिणाम होतो आणि व्यक्तीचे भविष्य धोक्यात येऊ शकते, याची जाणीव झाली. तसेच वाईट सवयींपासून दूर राहणे, योग्य व चांगल्या पर्यायांची निवड करणे आणि आपल्या कुटुंबीय व मित्रपरिवारामध्ये जनजागृती करणे यासाठीही विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली. हा उपक्रम माहितीपूर्ण आणि अर्थपूर्ण ठरला. विद्यार्थ्यांना निरोगी व अमली पदार्थमुक्त जीवन जगण्याचे महत्त्व समजून घेण्यास या उपक्रमाची मोठी मदत झाली.

## विद्याभवन नं. २ माध्यमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**प्र. मुख्याध्यापिका: श्रीमती श्रीलता रमेश नायर**

### आंतरराष्ट्रीय अमली पदार्थविरोधी दिन

दि. २६ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ विरोधी दिन म्हणून ओळखला जातो. विद्या भवन क्र.२ मध्ये दि. २५ जून २०२६ रोजी अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांविषयी जनजागृती करणे तसेच निरोगी व व्यसनमुक्त जीवनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यासाठी आंतरराष्ट्रीय अमली पदार्थविरोधी दिन साजरा करण्यात आला. दि. २६ जून रोजी मोहरमच्या सुट्टीमुळे हा उपक्रम एक दिवस आधी आयोजित करण्यात आला. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी विविध जनजागृतीपर उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग घेतला. पोस्टर तयार करणे, भाषणे, चर्चासत्रे आणि लघुनाटिका यांच्या माध्यमातून त्यांनी अमली पदार्थांच्या सेवनाचे दुष्परिणाम तसेच 'अमली पदार्थांना ठाम नकार द्या' हा संदेश प्रभावीपणे मांडला. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना योग्य निर्णय घेण्याची, चुकीच्या संगतीच्या दबावाला बळी न पडण्याची आणि आपल्या कुटुंबात तसेच समाजात जनजागृती करण्याची प्रेरणा मिळाली. या कार्यक्रमाद्वारे निरोगी, जबाबदार आणि व्यसनमुक्त जीवनशैलीचा संदेश प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.

### महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षा (२०२५-२०२६) मधील उल्लेखनीय यश

विद्या भवन हायस्कूल क्र. २ ने महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षा (२०२५- २०२६) मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. इ. ५वीतील २० आणि इ.८वीतील २८ अशा एकूण ४८ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त करून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. हे उज्ज्वल यश विद्यार्थ्यांची कठोर मेहनत, शिक्षकांचे समर्पित मार्गदर्शन आणि पालकांचे सातत्यपूर्ण सहकार्य यांचे फलित आहे. शैक्षणिक गुणवत्तेप्रती असलेल्या सर्वांच्या दृढ बांधिलकीमुळे संस्थेच्या नावलौकिकात पुन्हा एकदा भर पडली आहे. या अभिमानास्पद यशाबद्दल कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे तसेच विद्या भवन परिवारातर्फे सर्व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी, त्यांचे पालक आणि शिक्षकवृंद यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.

**शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी) निकाल**

| विद्यार्थ्याचे नाव | प्राप्त गुण | गुणवत्ता यादी क्रमांक |
|---|---|---|
| कु. हर्षवर्धिनी किरण पडवळ | ६६.४४ | K २२० |
| कु. श्रीध्दी नित्यानंद शर्मा | ६५.७७ | K २५४ |
| कु. सिया संजय वाघ | ६१.०७ | K ५०२ |

| | | |
|---|---|---|
| कु. दियांश तुषार राणे | ५९.०६ | K ६९५ |
| कु. औदुंबर आनंद मोहरे | ५७.०५ | K ८९० |
| कु. सर्वस्व जयवंत पाटील | ५६.३८ | K १०२१ |
| कु. स्वरा नितीन केंजळे | ५५.०३ | K ११८४ |
| कु. अनिश पंकज वाघ | ५५.०३ | K १२२० |
| कु. स्मिथिल संतोष कोळेकर | ५४.३६ | K १३०४ |
| कु. स्वराज सत्यवान मसुरकर | ५४.३६ | K १३४६ |
| कु. नील निखिल आरोटे | ५४.३६ | K १३७८ |
| कु. मैथिली दिनेश सावंत | ५३.६९ | K १४३१ |
| कु. सान्वी प्रशांत नेहारकर | ५३.६९ | K १४३२ |
| कु. अद्वैत राजाराम शिंदे | ५३.०२ | K १५६२ |
| कु. ऋषीकेश प्रमोद काळे | ५३.०२ | K १६२३ |
| कु. अनन्या किशोर अमृतकर | ५२.३५ | K १७६० |
| कु. मल्हार विजय खोत | ५२.३५ | K १७६१ |
| कु. ओवी पांडुरंग मालोंडकर | ५२.३५ | K १८०० |
| कु. सृष्टी भरत भेके | ५१.६८ | K १८६४ |
| कु. सर्वंभ नीतिश पवार | ५१.६८ | K १९५९ |

**शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) निकाल**

| विद्यार्थ्याचे नाव | प्राप्त गुण | गुणवत्ता यादी क्रमांक |
|---|---|---|
| कु. पूर्वा संतोष मेणे | ६९.८० | K १६७ |
| कु. समर्थ संदीप परब | ६७.११ | K २२२ |
| कु. समर्थ मारुती डोंगरे | ६५.१० | K २७८ |
| कु. सावनी दीपक हुमने | ६२.४२ | K ३६१ |
| कु. निभिष महेश थोरात | ५९.७३ | K ४९५ |
| कु. सिया राकेश केसवाणी | ५९.७३ | K ४९७ |
| कु. रुद्रांश नीतिन चौलकर | ५७.७२ | K ६२४ |
| कु. लावण्या रवींद्र सोनकुळे | ५७.७२ | K ६२५ |
| कु. त्रिशा नीतिन गुंजाळ | ५७.०५ | K ६६९ |
| कु. वेदांत सुरेंद्र घाडीगावकर | ५७.०५ | K ६७० |
| कु. अर्णव तुषार साळुंके | ५७.०५ | K ६८५ |
| कु. स्वरूप संतोष दळवी | ५५.०३ | K ८५३ |
| कु. तन्वी संदीप शिंदे | ५४.३६ | K ९०१ |
| कु. जान्हवी नवनाथ इथापे | ५४.३६ | K ९२७ |
| कु. तन्मय दीपक नेमळेकर | ५४.३६ | K ९४० |
| कु. शेख मोहमद मुझम्मील मोहमद इम्तियाज | ५३.०२ | K ११०७ |
| कु. त्रिशा निनाद लाड | ५३.०२ | K ११३४ |
| कु. आकांक्षा विशाल पवळे | ५२.३५ | K ११७७ |
| कु. वेदिका प्रकाश दुरगुडे | ५२.३५ | K ११९१ |
| कु. सारंग संजय शेळके | ५२.३५ | K १२१९ |
| कु. अनुश्री दीपक टाकळकर | ५२.३५ | K १२२० |
| कु. अनुष्का तुषार कांबळे | ५२.३५ | K १२३१ |
| कु. वैष्णवी सुधीर मांडवकर | ५१.०१ | K १४०३ |
| कु. अनया अमोल मालकर | ५१.०१ | K १४४० |
| कु. गार्गी गणेशपती रुके | ५०.३४ | K १५१९ |
| कु. केतकी मनोहर दावकर | ५०.३४ | K १५२० |
| कु. आराध्या उमेश मोरे | ५०.३४ | K १५३९ |
| कु. आराध्या राजेश मुळे | ५०३४ | K १५९५ |

## विद्याभवन पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी व इंग्रजी माध्यम

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**समन्वयिका : श्रीमती शुभांगी मच्छिंद्र जाधव**
**पर्यवेक्षिका : सौ. पूजा फरिया (इंग्रजी माध्यम)**

### आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

दि. २१ जून २०२६ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने वरिष्ठ बालवर्ग (सिनियर केजी) मधील विद्यार्थ्यांनी प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सूर्यनमस्काराची १२ आसने अतिशय शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण पद्धतीने सादर केली. लहान वयातच योगाचे महत्त्व, नियमित व्यायामाची सवय आणि निरोगी जीवनशैलीचे संस्कार विद्यार्थ्यांमध्ये रुजावेत, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. विद्यार्थ्यांनी आनंदाने व आत्मविश्वासाने सूर्यनमस्कार घालून योगाचे महत्त्व प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक

तंदुरुस्ती, मानसिक एकाग्रता, संतुलन आणि आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. योग ही भारताची जगाला लाभलेली अमूल्य देणगी असून, 'निरोगी शरीर, निरोगी मन'हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या कार्यक्रमातून करण्यात आला. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**समन्वयिका : श्रीमती शुभांगी मच्छिंद्र जाधव**

### आषाढी एकादशी उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरी

दि. २४ जुलै २०२६ रोजी आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात, भक्तिभावाने आणि पारंपरिक वातावरणात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाची सुरूवात श्री विठ्ठलाच्या भक्तिगीताने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल' या अखंड गजराने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. कार्यक्रमासाठी उभारण्यात आलेल्या आकर्षक देखाव्याने सर्वांचे विशेष लक्ष वेधून घेतले. फुलांची मनमोहक सजावट, तुळशीवृंदावन, गावातील घर, जात्यावर दळण दळणारी बाई, अशी पारंपरिक मांडणी आणि वारकरी संप्रदायाचे दर्शन घडवणारी सजावट यामुळे उपस्थितांना जणू पंढरपूरच्या आषाढी वारीचा प्रत्यक्ष अनुभव लाभला. तसेच 'भक्त पुंडलिक आणि श्री विठ्ठल' यांच्या भेटीवर आधारित नाट्यप्रसंग लहानग्यांनी अत्यंत आत्मीयतेने आणि प्रभावी अभिनयातून सादर केला. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत साकारलेली दिंडी कार्यक्रमाचा विशेष आकर्षणबिंदू ठरली. टाळचिपळ्यांच्या निनादात, विठ्ठलनामाच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेची सुंदर झलक सादर केली. विठ्ठल, रुक्मिणी, वारकरी, संत आणि भक्त पुंडलिक यांच्या आकर्षक वेशभूषेने कार्यक्रमाची शोभा अधिकच खुलून दिसली. विद्यार्थ्यांनी सादर केलेली भक्तिगीते, अभंग, पद्ये आणि निरागस अभिनयाने सर्वांची मने जिंकली. यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व समजावून सांगत वारकरी संप्रदायातील भक्ती, सेवा, समता आणि संस्कार यांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हा कार्यक्रम अत्यंत आनंददायी आणि संस्मरणीय ठरला. ***

**❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय ❊**




**आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांविषयी जनजागृती करणारी विद्यार्थ्यांनी तयार केलेली पोस्टर्स दाखवताना विद्याभवन नं. १ चे विद्यार्थी**

# विद्याभवन संकुल
# नेरूळ शाखा, नवी मुंबई
**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी
**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**प्र. मुख्याध्यापिका : श्रीमती श्रीजा नायर**

**शिष्यवृत्ती परीक्षा २०२५-२६**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती (इ.५वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ. ८वी) या परीक्षांमध्ये माध्यमिक इंग्रजी विभागातील एकूण २० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली आहे.

**शिष्यवृत्ती परीक्षा (इ.५ वी) अंतिम निकाल**

| विद्यार्थ्याचे नाव | गुण २९८ पैकी | गुणवत्ता यादी क्रमांक ठाणे जिल्हा |
|---|---|---|
| कु. आदित्य उल्हास भोसले | २३६ | २४ वा |
| कु. प्रार्थना प्रवीण पाटील | २२० | ५६ वी |
| कु. प्रिन्स प्रसन्नकुमार कांबळे | २२० | ५९ वा |
| कु. धीरज योगेश गुरव | २१० | ११५ वा |
| कु. त्रिशा रजनीश चतुर्वेदी | १९४ | २४८ वी |
| कु. इलाही सय्यद घुडूसाब | १९४ | २५६ वा |

मार्गदर्शक शिक्षक : श्रीमती अनुपमा कोटियन, श्रीमती शीतल येंगे, श्रीमती मनीषा मुळे आणि श्रीमती पौर्णिमा कोकरे

| विद्यार्थ्याचे नाव | गुण २९८ पैकी | गुणवत्ता यादी क्रमांक ठाणे जिल्हा |
|---|---|---|
| कु. वैभव कमलेश गुप्ता | २४० | २३ वा |
| कु. गार्गी किशोर गोळे | २२४ | ५० वी |
| कु. तेजस सचिन गर्जे | २२० | ६८ वा |
| कु. अद्वैत काका कोकरे | २०२ | ११३ वा |
| कु. प्रतीक विक्रम थोरात | २०० | १२६ वा |
| कु. श्रावणी हणमंत बुरुंगले | २०० | १२८ वी |
| कु. आर्या अमित कदम | २०० | १३२ वी |
| कु. उन्नती अमोल कुळसंगे | २०० | १३३ वी |
| कु. वेदांती पांडुरंग जाधव | १८८ | २०१ वी |
| कु. ध्येय राजेश गांधी | १७८ | २१९ वा |
| कु. आराध्या संतोष कांबळे | १७६ | ३२१ वी |
| कु. सना फातिमा शाहिद सिद्दीकी | १७४ | ३४९ वी |
| कु. कार्तिक मोतीराम लवटे | १७२ | ३७९ वा |
| कु. भार्गव विष्णू देसाई | १७२ | ३८२ वा |

मार्गदर्शक शिक्षक : श्रीमती श्रीजा नायर, श्रीमती कल्पना सोनार, श्री. मनोज मयेकर आणि श्री. जगन्नाथ कोळी

## विद्याभवन माध्यमिक मराठी शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय,
### नेरूळ शाखा, नवी मुंबई
**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**प्राचार्य : श्री. गोरख रा. कदम**

**आनंदादायी शनिवार उपक्रमांतर्गत आवाजाची कार्यशाळा**

आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत शनिवार दि. २७ जून २०२६ रोजी विद्याभवन सभागृह, नेरूळ, नवी मुंबई येथे 'आवाजाची कार्यशाळा' आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक श्री. राजेश तावडे होते. त्यांनी आवाजाचे महत्त्व, स्पष्ट उच्चार, योग्य स्वर, श्वसन तंत्र, संवाद कौशल्य आणि अध्यापनामध्ये प्रभावी आवाजाचा वापर याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विविध प्रात्यक्षिके व सरावाच्या माध्यमातून उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांना आवाजाचा योग्य वापर कसा करावा याचे प्रशिक्षण देण्यात आले. सदर कार्यशाळेत कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

या कार्यक्रमाचे आयोजन वरिष्ठ शिक्षक श्री. अविनाश कुलकर्णी यांनी केले. प्रमुख मार्गदर्शकांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**अमली पदार्थ विरोधी जनजागृती कार्यक्रम**

शनिवार दि. २७ जून २०२६ रोजी जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त सहा. पोलिस निरीक्षक श्री. निलेश चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या दुष्परिणामांची जाणीव करून देत 'से नो टू ड्रग्ज' हा कानमंत्र दिला. पोलिस निरीक्षक श्री. संजय लाड यांनी वाईट गोष्टींच्या आहारी जाण्यापेक्षा खेळ, व्यायाम आणि छंद जोपासण्याचा सल्ला दिला. तसेच पोलिस उपनिरीक्षक कीर्ती चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना ड्रग्जविरोधी शपथ दिली. मार्गदर्शन करताना मान्यवरांनी अंमली पदार्थाचे व्यसन हे व्यक्ती, कुटुंब आणि समाजासाठी अत्यंत घातक असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारच्या व्यसनांपासून दूर रहावे, चुकीच्या संगतीपासून सावध राहावे आणि निरोगी, शिस्तबद्ध व सकारात्मक जीवनशैलीचा स्वीकार करावा असे आवाहन केले. याप्रसंगी कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक गोरख कदम, समन्वयक पांडुरंग मुळीक तसेच सर्व शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

**जागतिक हृदय दिन सी. पी. आर. शपथ अभियान**

गुरुवार दि. ९ जुलै २०२६ रोजी जागतिक हृदय दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अपोलो हॉस्पिटल, नवी मुंबई येथील तज्ज्ञ मार्गदर्शक डॉ. श्वेता भोज, श्री. निकेत पाटील व इतर सहकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये हृदयविकाराच्या आपत्कालीन परिस्थितीत सी. पी. आर. चे महत्त्व सांगणे तसेच एखाद्या व्यक्तीचा जीव वाचविण्याबाबत जनजागृती करणे हा होता. प्रमुख मार्गदर्शक डॉ. श्वेता भोज व श्री. निकेत पाटील यांनी सी. पी. आर कसा द्यावा याच्या चार पायऱ्या उपस्थित असलेल्या विद्यार्थी, पालक व शिक्षक यांना प्रात्यक्षिकाद्वारे दाखविल्या. तसेच डॉ. श्वेता भोज यांनी उपस्थितांना सी. पी. आर. शिकण्याची व गरज पडल्यास तत्परतेने मदत करण्याची प्रतिज्ञा दिली. या कार्यक्रमास मुख्याध्यपक श्री. गोरख कदम आवर्जून उपस्थित होते. या कार्यक्रमास विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उपक्रमाद्वारे हृदयविकाराच्या आपत्कालीन परिस्थितीत योग्य प्रथमोपचार देण्याबाबत सर्वांमध्ये जागरूकता निर्माण झाली.

**शिष्यवृत्ती परीक्षा २०२५-२६**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या मार्फत फेब्रुवारी २०२६ मध्ये पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इ. ८वी घेण्यात आली. या परीक्षेत एकूण चार विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले.

| विद्यार्थ्यांचे नाव | गुण २९८ पैकी | गुणवत्ता यादी क्रमांक ठाणे जिल्हा |
|---|---|---|
| कु. विभूती दत्तात्रय गुंजाळ | २६६ | ३ री |
| कु. वेदश्री विश्वनाथ राक्षे | २०४ | १०७ वी |
| कु. अथर्व अनिल गायकवाड | १७६ | ३३६ वा |
| कु. तन्वी संजय मस्कर | १७६ | ३३९ वी |

सर्व विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम आणि मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ यांनी गुलाबपुष्प, पेढे व शैक्षणिक साहित्य किट देऊन अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## विद्याभवन प्राथमिक मराठी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

**शिष्यवृत्ती परीक्षा २०२५-२६**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत फेब्रुवारी २०२६ मध्ये पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली. एकूण तीन विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले. ठाणे जिल्ह्यातून एकूण ४९५

विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादीत स्थान दिले जाते. शिष्यवृत्ती परीक्षा (इ.५ वी) अंतिम निकाल -

| विद्यार्थ्याचे नाव | गुण २९८ पैकी | गुणवत्ता यादी क्रमांक ठाणे जिल्हा |
|---|---|---|
| कु. आरुष बाबासाहेब कानवडे | २१८ | ६७ वा |
| कु. गौरव मालोजी गवळी | १९८ | २०६ वा |
| कु. स्वयम जयदीप पाटील | १८२ | ४५२ वा |

मार्गदर्शक शिक्षक : श्रीमती राधिका भोसले, श्रीमती आरती औचर आणि श्रीमती नूतन गवांदे

सर्व विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ यांनी गुलाबपुष्प, पेढा आणि शैक्षणिक साहित्य किट देऊन अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**मुंबई महापौर कराटे चॅम्पियनशिप २०२६**

रविवार दि. ५ जुलै २०२६ रोजी कराटे डो असोसिएशन, मुंबई यांच्यातर्फे आयोजित 'मुंबई महापौर कराटे चॅम्पियनशिप २०२६' या स्पर्धेत कु. आर्यन दिलीप यादव (इ. ६वी) या विद्यार्थ्याने 'कुमिते' या प्रकारात तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. **कु. आर्यन याचे संस्थेच्या व शाळेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !** ***

**मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय वृत्त**
**पृष्ठ क्र. १० वरून पुढे**

करणे होय. मॅथ क्लबची सदस्य असलेली विद्यार्थिनी कु. स्वरा शेडगे इ. १० वी अ हिने उपस्थितांचे आभार मानले.

**PASCH या संस्थेच्या प्रतिनिधींनीची प्रशालेस भेट**

दि. १६ जुलै २०२६ रोजी PASCH या संस्थेच्या प्रतिनिधींनींनी प्रशालेस भेट दिली. या भेटीदरम्यान, PASCH च्या प्रतिनिधी श्रीमती शिवाली गोरे-आचार्य आणि प्राचार्य श्रीमती जयती नरवणे, तसेच माध्यमिक विभागातील जर्मन भाषेच्या शिक्षिका कु. ईशा जोशी आणि उच्च माध्यमिक विभागातील जर्मन शिक्षिका सौ. अमृता केळकर यांनी सविस्तर मूल्यमापन आणि चर्चा केली. या प्रतिनिधींनी यावेळी जर्मन भाषा वर्गाला आणि ग्रंथालयाला भेट दिली.

**पालखी सोहळा**

दि. २७ जुलै २०२६ रोजी आषाढी एकादशीचे औचित्य साधून पालखी सोहळ्याचे आयोजन केले होते. यावेळेस इ. ७वी आणि ८वीच्या विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांचा पारंपरिक पोशाख धारण केलेला होता. विठ्ठल नामाच्या जयघोषात पालखीचे आगमन झाले. या कार्यक्रमाची सुरूवात प्राचार्य सौ. जयती नरवणे, पर्यवेक्षिका सौ. विजया काळे आणि सौ. गौरी राजगुरू यांनी विठ्ठल रुक्मिणीच्या पूजनाने केली. काही विद्यार्थ्यांनी विविध संतांच्या पारंपरिक वेशभूषा करून संत परंपरेचे दर्शन घडवले. अभंग, दिंडी, लेझीमनृत्य, फुगड्या याने संपूर्ण वातावरण विठ्ठल भक्तीमय झाले होते. सर्व शिक्षकांनी श्री विठ्ठलाच्या जयघोषात केलेले रिंगण या कार्यक्रमाचे आकर्षण ठरले. या सोहळ्याची सांगता आरती आणि पसायदानाने झाली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. वैशाली गाडे आणि सौ. मोहना बाभळे यांनी केले. इ. ७वी ते १२वीच्या विद्यार्थ्यांनी या सोहळ्यात सहभाग घेतला. ***

**आपला पत्ता बदललेला आहे का?**

**समाचार संदर्भातील आपला बदललेला पत्ता त्वरित कळवावा ही विनंती.**
**पत्ता कळविताना जुना व नवा दोन्ही पिन कोड तसेच आपला ईमेल आयडी सुध्दा कळवावा म्हणजे आपणास ई-समाचार पाठविणे सोईचे होईल.**

pvgsamachar@gmail.com
**या ईमेल आयडी वर कळवावे.**

**संपादक**

## पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी २०२५-२६ (इंग्रजी माध्यम)



कु. आदित्य उल्हास भोसले
२३६/२९८
ठाणे जिल्ह्यात २४ वा



कु. प्रार्थना प्रवीण पाटील
२२०/२९८
ठाणे जिल्ह्यात ५६ वी



कु. प्रिन्स प्रसन्नकुमार कांबळे
२२०/२९८
ठाणे जिल्ह्यात ५९ वा



कु. धीरज योगेश गुरव
२१०/२९८
ठाणे जिल्ह्यात ११५ वा



कु. त्रिशा रजनीश चतुर्वेदी
१९४/२९८
ठाणे जिल्ह्यात २४८ वी



कु. इलाही सय्यद घुडूसाब
१९४/२९८
ठाणे जिल्ह्यात २५६ वा

## पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी २०२५-२६ (मराठी माध्यम)



कु. आरुष बाबासाहेब कानवडे
२१८/२९८
ठाणे जिल्ह्यात ६७ वा



कु. गौरव मालोजी गवळी
१९८/२९८
ठाणे जिल्ह्यात २०६ वा



कु. स्वयम जयदीप पाटील
१८२/२९८
ठाणे जिल्ह्यात ४५२ वा

## पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती इ. ८ वी गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी २०२५-२६ (मराठी माध्यम)



कु. विभुती दत्तात्रय गुंजाळ
२६६/२९८
ठाणे जिल्ह्यात ३ री



कु. वेदश्री विश्वनाथ राक्षे
२०४/२९८
ठाणे जिल्ह्यात १०७ वी



कु. अथर्व अनिल गायकवाड
१७६/२९८
ठाणे जिल्ह्यात ३३६ वा



कु. तन्वी संजय मस्कर
१७६/२९८
ठाणे जिल्ह्यात ३३९ वी

## पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती इ. ८ वी गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी २०२५-२६ (इंग्रजी माध्यम)


कु. वैभव कमलेश गुप्ता
२४०/२९८
ठाणे जिल्ह्यात २३ वा


कु. गार्गी किशोर गोळे
२२४/२९८
ठाणे जिल्ह्यात ५० वी


कु. तेजस सचिन गर्जे
२२०/२९८
ठाणे जिल्ह्यात ६८ वा


कु. अद्वैत काका कोकरे
२०२/२९८
ठाणे जिल्ह्यात ११३ वा


कु. प्रतीक विक्रम थोरात
२००/२९८
ठाणे जिल्ह्यात १२६ वा


कु. श्रावणी हणमंत बुरुंगले
२००/२९८
ठाणे जिल्ह्यात १२८ वी


कु. आर्या अमित कदम
२००/२९८
ठाणे जिल्ह्यात १३२ वी


कु. उन्नती अमोल कुळसंगे
२००/२९८
ठाणे जिल्ह्यात १३३ वी


कु. वेदांती पांडुरंग जाधव
१८८/२९८
ठाणे जिल्ह्यात २०१ वी


कु. ध्येय राजेश गांधी
१७८/२९८
ठाणे जिल्ह्यात २१९ वा


कु. आराध्या संतोष कांबळे
१७६/२९८
ठाणे जिल्ह्यात ३२१ वी


कु. सना फातिमा शाहिद सिद्दीकी
१७४/२९८
ठाणे जिल्ह्यात ३४९ वी


कु. कार्तिक मोतीराम लवटे
१७२/२९८
ठाणे जिल्ह्यात ३७९ वा


कु. भार्गव विष्णू देसाई
१७२/२९८
ठाणे जिल्ह्यात ३८२ वा

## विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक

**उपकार्याध्यक्ष : श्री. अमोल म. जोशी**

### प्राचार्य शरद कोठावदे व ज्येष्ठ उपशिक्षक श्री. सुकदेव निंबेकर यांचा सेवापूर्ती समारंभ संपन्न

प्राचार्य श्री. शरद कोठावदे व ज्येष्ठ उपशिक्षक श्री सुखदेव निंबेकर हे दि. ३० जून २०२६ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त आयोजित करण्यात आलेला त्यांचा सेवापूर्ती समारंभ उत्साहपूर्ण व भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी हे होते. कार्यक्रमाची सुरूवात सरस्वती पूजनाने झाली. श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते सेवानिवृत्त होत असलेल्या प्राचार्य श्री. शरद कोठावदे आणि उपशिक्षक श्री. सुकदेव निंबेकर यांचा शाल, स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच तळेगाव पंचक्रोशीतील माजी विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ व विविध क्षेत्रातील मान्यवरांनीही सत्कारमूर्तींचा गौरव केला. यावेळी माजी विद्यार्थी तथा संगणक तज्ज्ञ श्री. सुनील खांडबहाले आणि माजी विद्यार्थिनी कु. ईश्वरी मोरे, कु. कार्तिकी महाले, कु. तनुजा यांनी मनोगत व्यक्त करताना, प्राचार्य श्री. शरद कोठावदे व उपशिक्षक श्री. सुकदेव निंबेकर यांच्या मोलाच्या मार्गदर्शनामुळे जीवनात यशस्वी होण्यास अनमोल मदत झाल्याची भावना व्यक्त करून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. ज्येष्ठ उपशिक्षक श्री. सुरेश वाघमारे यांनी दोन्ही शिक्षकांच्या प्रदीर्घ सेवाकाळाचा आढावा घेत त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. विद्यार्थीप्रिय शिक्षक, आदर्श सहकारी म्हणून ते कायम स्मरणात राहतील, असे भावपूर्ण उद्गार त्यांनी काढले.

प्राचार्य श्री. शरद कोठावदे यांच्या कुटुंबीयांतर्फे सौ. छाया कोठावदे, कु. ऋतुजा कोठावदे व कु. शुभम कोठावदे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना कुटुंबप्रमुख म्हणून त्यांचा अभिमान वाटत असल्याचे सांगितले. यावेळी कोठावदे परिवारातर्फे शालेय पोषण आहार शिजविणाऱ्या कर्मचाऱ्यांचा साडी देऊन सत्कार करण्यात आला. तसेच विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना Digital Slates चे वाटप करण्यात आले.

अध्यक्षीय मनोगतात श्री. अमोल जोशी यांनी प्राचार्य श्री. शरद कोठावदे व श्री. सुकदेव निंबेकर यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, शैक्षणिक गुणवत्ता वृद्धीसाठी आणि संस्थेच्या प्रगतीसाठी दिलेल्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करून त्यांना निरोगी, आनंदी व यशस्वी निवृत्त जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच श्री. शरद कोठावदे यांनी संस्था विकासासाठी रु. दोन लक्ष व श्री. सुकदेव निंबेकर यांनी रु. एक लक्ष इतकी देणगी दिल्याबद्दल संस्थेतर्फे त्यांचे आभार मानले.

श्री. शरद कोठावदे आणि श्री. सुकदेव निंबेकर यांनी आपल्या मनोगतात सहकारी शिक्षक, विद्यार्थी, पालक, संस्था व्यवस्थापन आणि हितचिंतकांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमास कै. काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटीचे मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, सेवानिवृत्त पर्यवेक्षक श्री. संजय जोशी, तळेगावचे सरपंच श्री. रवींद्र निंबेकर, कोठावदे आणि निंबेकर कुटुंबीय, सहकारी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आजी-माजी विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्रीमती प्रीती राजपूत यांनी केले. उपस्थितांचे आभार श्री. राजेंद्र जगताप यांनी मानले.

### प्राचार्यपदी नियुक्ती

दि. १७ जुलै २०२६ रोजी संस्थेने विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, तळेगाव (अं.) नाशिक या विद्यालयाच्या प्राचार्यपदी श्री. सुरेश नारायण वाघमारे यांची नियुक्ती केली आहे. सदर नियुक्ती बद्दल

श्री. सुरेश वाघमारे यांचा उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

**शिक्षक प्रतिनिधी नियुक्ती**

दि. १७ जुलै २०२६ रोजी विद्यालयातील उपशिक्षिका श्रीमती प्रीती राजपूत यांची सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी शिक्षक प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. त्यांचा सत्कार प्राचार्य श्री. सुरेश वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आला. ***

## * विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, तळेगांव (अं.) नाशिक *




विद्यालयातील गरजू होतकरू विद्यार्थ्यांना विविध देणगीदारांनी दिलेले गणवेश वितरण प्रसंगी ग्रंथपाल सौ. अर्चना गीत व उपशिक्षिका श्रीमती प्रतिभा ठाकूर

## * डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ–नाशिक *



दि. ३ जुलै २०२६ रोजी 'सप्तरंगी हस्तकला' या उपक्रमात आनंदाने सहभागी झालेले पूर्व प्राथमिक विभागाचे विद्यार्थी



प्रज्ञाशोध परीक्षेत ट्रॉफी मिळवणारी कु. हंसिका हरिओम सोनवणे आणि पदक मिळवणारी कु. किमया चौधरी

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ–नाशिक पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभाग

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : सौ. प्रतिमा वैद्य**

**रौप्य महोत्सवी वर्षाचा समारोप : 'रौप्य प्रवासाचा समारोप - सुवर्णयुगाची सुरूवात'**

दि. १८ जुलै २०२६ रोजी डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, नाशिक येथे 'रौप्य प्रवासाचा समारोप - सुवर्णयुगाची सुरूवात' या संकल्पनेवर आधारित रौप्य महोत्सवी वर्षाचा समारोप सोहळा दादासाहेब गायकवाड सभागृहात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यालयाच्या यशस्वी पंचवीस वर्षांच्या शैक्षणिक वाटचालीचा गौरव या सोहळ्यात करण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर करून उपस्थितांचे स्वागत केले. मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी प्रमुख पाहुणे, संस्थेचे पदाधिकारी, मान्यवर आणि उपस्थितांचे स्वागत करून रौप्य महोत्सवी वर्षाच्या समारोप सोहळ्याचे औचित्य स्पष्ट केले. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

या समारंभाचे प्रमुख अतिथी ज्येष्ठ मराठी साहित्यिक, कवी, नाटककार, इतिहास संशोधक, प्रवचनकार, कीर्तनकार तसेच संत तुकाराम महाराजांचे वंशज डॉ. सदानंद मोरे हे होते. त्यांचा सत्कार कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विद्यालयाच्या स्थापनेपासून, म्हणजेच दि. १६ जून २००१ पासून आजपर्यंत सातत्याने सेवेत कार्यरत असलेल्या मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांचा सत्कार करण्यात आला. तसेच शाळेच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या माजी मुख्याध्यापिका सौ. मनीषा साठे यांचा गौरव करण्यात आला. माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील, तसेच माध्यमिक विभागाच्या शिक्षिका सौ. सोनिया राजवाडे आणि सौ. वैशाली देवरे यांचाही सत्कार करण्यात आला. संस्थेचे हितचिंतक व इतर मान्यवरांचाही यथोचित सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी विद्यालयाच्या रौप्य महोत्सवी स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. सदानंद मोरे यांनी विद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच सामाजिक मूल्यशिक्षणाच्या कार्याचे मनःपूर्वक कौतुक केले. विद्यार्थ्यांनी ज्ञान, संस्कार आणि शिस्त यांचा अंगीकार करून स्वतःचे उज्ज्वल भविष्य घडवावे तसेच भारताचे सुजाण नागरिक बनावे, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला.

या कार्यक्रमात प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी अभंगांवर आधारित गायन व नृत्याचे मनोहारी सादरीकरण केले. माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी विद्यालयाची पंचवीस वर्षांची प्रगती आणि म्हसरूळ शाखेच्या विस्तारावर आधारित प्रभावी सादरीकरण करून उपस्थितांची दाद मिळवली. या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे पंचवीस वर्षांचा गौरवशाली प्रवास अविस्मरणीय ठरला. या कार्यक्रमास उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, संचालक श्री. आनंद कुलकर्णी, संस्थेच्या देणगीदार श्रीमती सिंधुताई धामणकर, संस्थेचे माजी संचालक श्री. प्रभाकर कुलकर्णी, पालक-शिक्षक संघाचे सदस्य, पालक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील व मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी प्रेरणादायी मनोगत व्यक्त केले. सौ. वैशाली मुंदाणकर यांनी

आभारप्रदर्शन करून प्रमुख पाहुणे, मान्यवर, संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी तसेच कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी योगदान देणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानले. 'वंदे मातरम्' या राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली आणि विद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीतील नव्या सुवर्णयुगाची आशादायी सुरूवात झाल्याचा विश्वास सर्वांनी व्यक्त केला.

## पूर्व प्राथमिक विभाग

### आपली शाळा एक परिचय

दि. २५ जून २०२६ रोजी 'आपली शाळा एक परिचय' हा उपक्रम घेण्यात आला. या दिवशी विद्यार्थ्यांना शाळेची सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच त्यांना शाळेतील विविध वर्ग, लिपिक कार्यालय, मुख्याध्यापकांचा कक्ष, वाचनालय आणि संगणक कक्ष दाखवून त्याविषयी माहिती देण्यात आली. शाळेची बाग, तेथील खेळणी आणि क्रीडांगण पाहून विद्यार्थ्यांना खूप आनंद झाला.

### सप्तरंगी हस्तकला

दि. ३ जुलै २०२६ रोजी विद्यार्थ्यांसाठी 'सप्तरंगी हस्तकला' हा आनंददायी व सृजनशील उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी विविध रंगांच्या कागदांचा वापर करून सुंदर इंद्रधनुष्य तयार केले. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना इंद्रधनुष्यातील सात रंगांची ओळख करून दिली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे रंगांविषयीचे ज्ञान वाढण्यास मदत झाली.

### सप्तरंगी अल्पोपहार

दि. १० जुलै २०२६ रोजी बालवाडीच्या विद्यार्थ्यांसाठी 'सप्तरंगी अल्पोपहार' हा आनंददायी उपक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थ्यांनी इंद्रधनुष्याच्या विविध रंगांनुसार फळे, भाज्या, रंगीबेरंगी इडल्या, आप्पे, डोसे आदी पौष्टिक खाद्यपदार्थ आणले. प्रत्येक रंगाचे महत्त्व, त्या रंगातील अन्नपदार्थांचे पोषणमूल्य आणि आरोग्यासाठी त्यांचे फायदे याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी व पौष्टिक अल्पोपहाराचा मनमुराद आनंद घेत कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या उपक्रमामुळे मुलांमध्ये निरोगी आहाराच्या सवयी, रंगांची ओळख आणि निरीक्षण कौशल्य विकसित होण्यास मदत झाली. या प्रसंगी मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी विद्यार्थ्यांच्या उत्साहाचे कौतुक केले.

### हातांच्या ठशांची आकर्षक कलाकृती

दि. १७ जुलै २०२६ रोजी 'इंद्रधनुष्य सप्ताह' निमित्त 'हातांच्या ठशांद्वारे आकर्षक कलाकृती' हा सृजनशील उपक्रम उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थ्यांनी इंद्रधनुष्याच्या विविध रंगांचा वापर करून हातांचे ठसे उमटवत सुंदर आणि आकर्षक कलाकृती साकारल्या. मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली व शिक्षकांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण वातावरण रंगतदार आणि आनंदमय झाले. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिकदृष्ट्या उपयुक्त, आनंददायी आणि संस्मरणीय ठरला.

## प्राथमिक विभाग

### योगदिन

दि. २१ जून २०२६ रोजी विद्यालयात २२ वा आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात साजरा करण्यात आला. योगसाधनेमुळे मानसिक, बौद्धिक व शारीरिक विकास होतो. विद्यार्थ्यांची आत्मशक्ती जागृत होते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये योगसाधनेचे महत्त्व रुजविणे आवश्यक आहे. योगशिक्षक डॉ. तुषार पाटील, सौ. भाग्यश्री कर्पे व सौ. मंगला दरेकर यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी विविध योगासने व प्राणायामाचा सराव विद्यार्थ्यांकडून करून घेतला. या कार्यक्रमास कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश पाटील, मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य व श्रीमती भारती पाटील, शिक्षक, विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या शिक्षिका सौ. निशिगंधा सोमवंशी यांनी केले.

**कौतुकास्पद वार्ता**

प्रज्ञाशोध परीक्षा जानेवारी महिन्यात घेण्यात आली होती. या परीक्षेसाठी इ. १ली ते ७वीपर्यंतचे विद्यार्थी सहभागी झाले होते. इ. ६वीतील कु. सक्षम महाले, कु. हंसिका हरिओम सोनवणे हिने ट्रॉफी, तर कु. किमया चौधरी, कु. मितेश देशमुख, कु. मनस्वी वडजे आणि कु. श्रेयस भिरूड यांनी पदक मिळवले. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ व मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**परिवहन समिती**

दि. २३ जून २०२६ रोजी शाळेत परिवहन समितीची स्थापना करण्यात आली. या कार्यक्रमासाठी श्रीमती प्रियंका मोकल (वाहन निरीक्षक, पोलीस विभाग) उपस्थित होत्या. त्यांनी शाळेचे बसचालक, बस मदतनीस तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी सांभाळणाऱ्या कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. सुरक्षित वाहतूक, विद्यार्थ्यांची काळजी व वाहतूक नियमांचे पालन याबाबत त्यांनी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.

**स्वामी विवेकानंद पुण्यतिथी**

दि. ४ जुलै २०२६ रोजी स्वामी विवेकानंद पुण्यतिथीनिमित्त शाळेत कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शिक्षिका सौ. वैशाली मुंदाणकर यांनी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर सौ. सोनल अमृतकर यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवनकार्याची व विचारांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.


कु. अन्वया दशपुते

**अभिमानास्पद वार्ता**

दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेची गुणवत्तायादी ३ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध झाली. इ. ५वीचे एकूण ६६ विद्यार्थी या परीक्षेस प्रविष्ट झाले होते. त्यापैकी कु. अन्वया मनोज दशपुते हिने जिल्हास्तरावर १३९ वा क्रमांक मिळवून गुणवत्तायादीत स्थान पटकावले. कु. अन्वया दशपुते हिचे कार्यवाह श्री. संजय गुंजाळ व मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी अभिनंदन केले आणि शुभेच्छा दिल्या.

**अभिनंदनीय वार्ता**

मंथन राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेचा निकाल दि. २७ मार्च २०२६ रोजी लागला. या परीक्षेस ३३ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. यशस्वी विद्यार्थी खालीलप्रमाणे -

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता |
|---|---|
| कु. अर्णव खालकर | ५वी |
| कु. आरुषी संकोपाल | ४थी |
| कु. त्रिशा जाधव | ४थी |
| कु. प्रांजल आघाव | ७वी |

**पालक-शिक्षक संघ स्थापना**

दि. २२ जुलै २०२६ रोजी प्रशालेत इ. १ली ते ७वीच्या पालकांची सभा संपन्न झाली. या सभेत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी पालक-शिक्षक संघ, माता पालक संघ आणि विशाखा समितीची स्थापना करण्यात आली.

**सहाय्यक पोलीस अधीक्षक यांचा विद्यार्थ्यांशी सुसंवाद**

दि. १७ जुलै २०२६ रोजी श्री. शेखर देशमुख सहाय्यक पोलीस अधीक्षक पंचवटी नाशिक विभाग, श्री. संतोष नवले पोलीस हवालदार, श्री. सारंग देशमुख, पोलीस हवालदार यांनी शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. श्री. शेखर देशमुख यांनी विद्यार्थ्यांना आपण जागृत राहून पोलिसांची मदत कशी घ्यायची तसेच पोलिसांना सहकार्य कसे करावे? या विषयी मार्गदर्शन केले. तसेच शिक्षक, वाहन चालक, वाहन मदतनीस यांनी विद्यार्थ्यांना मदत करून सहकार्य करण्यास मार्गदर्शन केले. सहा. पोलीस अधीक्षक श्री. शेखर देशमुख यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्याबद्दल शिक्षिका सौ. वैशाली मुन्दाणकर यांनी आभार प्रदर्शन केले. ***

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल, म्हसरूळ–नाशिक

## माध्यमिक व उच्च माध्यमिक विभाग

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ**

**मुख्याध्यापिका : श्रीमती भारती पाटील**

**शिक्षकांचे प्रेरणादायी प्रशिक्षण सत्र संपन्न**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७च्या प्रारंभानिमित्त चार दिवसीय शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या बदलत्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्य आणि नाविन्यपूर्ण दृष्टिकोनांनी शिक्षकांना परिपूर्ण करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

कार्यक्रमाची सुरूवात सरस्वती पूजनाने झाली. उद्घाटन सत्राला कार्यवाह श्री. संजय गुंजाळ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आपल्या प्रेरणादायी भाषणात त्यांनी शिक्षकांना बदल स्वीकारण्याचे, अध्यापनात नाविन्य जोपासण्याचे आणि जबाबदार भविष्याभिमुख नागरिक घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावण्याचे आवाहन केले.

सत्राच्या पहिल्या दिवशी शिक्षण तज्ज्ञ श्री. सुनील भाकरे यांनी 'कौशल्याधारित आणि बहुविषयक शिक्षण NEP २०२० ची गरज' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी २१व्या शतकातील आव्हानांना सामोरे जाण्यास सक्षम विद्यार्थी घडविण्यासाठी कौशल्याधारीत शिक्षण, चिकित्सक विचार आणि सर्जनशीलतेचे महत्त्व अधोरेखित केले.

दुसऱ्या दिवशी डॉ. सुप्रिया बंगेरा यांनी 'हार्टफुल टीचर' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी सजगता, भावनिक स्वास्थ्य आणि करुणामय अध्यापन पद्धतीचे महत्त्व विशद केले. या गुणांमुळे सकारात्मक आणि पोषक शैक्षणिक वातावरण निर्माण होण्यास मदत होते असे त्यांनी सांगितले.

तिसऱ्या दिवशी अलका पटेल यांनी 'संवाद कौशल्य'या विषयावर सत्र घेतले. प्रभावी संवाद आणि सकारात्मक परस्पर संवादामुळे वर्गातील अध्यापन अधिक परिणामकारक होते. यावर त्यांनी भर दिला.

सत्राच्या अंतिम दिवशी मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांनी 'विविध क्षमतांच्या विद्यार्थ्यांसाठी समावेशक अध्यापन' या विषयावर मार्गदर्शन केले. विविध उपक्रम आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून त्यांनी सर्व समावेशक अध्यापन पद्धती, नाविन्यपूर्ण वर्ग नीती आणि चिंतनशील अध्यापनाच्या माध्यमातून प्रत्येक विद्यार्थ्याला अर्थपूर्ण शिक्षणाच्या संधी कशा उपलब्ध करून देता येतील याबाबत मार्गदर्शन केले. शाळा व्यवस्थापनाचे पाठबळ, मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील व सौ. प्रतिमा वैद्य यांचे नियोजन शिक्षकांचा उस्फूर्त सहभाग आणि तज्ज्ञांचे मोलाचे मार्गदर्शन यामुळे कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली.

***

### * नम्र विनंती *

**देणगीदार व हितचिंतक यांनी संस्थेच्या बँक खात्यावर ऑनलाईन देणगी रक्कम पाठविल्यानंतर कृपया संस्थेच्या ई-मेल आयडीवर किंवा संस्थेच्या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधून, देणगी देणाऱ्याचे पूर्ण नाव, पत्ता व देणगी देण्याचे निमित्त आणि विनियोग इ. माहिती कळवावी. तसेच पॅन कार्डची प्रत पाठवावी. बँकेत देणगी रक्कम जमा झाल्यावर फक्त रक्कम समजते. बाकी सविस्तर माहिती कळत नाही.**

**ई-मेल : pvgheadoffice@gmail.com**

**दूरध्वनी क्रमांक : ०२०-२४४७०९२७ / २४४७०५७३**

**राजेंद्र बोऱ्हाडे**
**कार्याध्यक्ष**

## श्रीराम सदाशिव धामणकर वाणिज्य, विज्ञान आणि कला महाविद्यालय, म्हसरूळ शाखा, नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय नि. गुंजाळ**

**प्राचार्य : डॉ. एस. जी. वाकचौरे**

### करिअर संसद शपथविधी - करिअर कट्ट्याच्या माध्यमातून युवा कौशल्यक्षम पिढी घडविणे

बुधवार दि. १५ जुलै २०२६ रोजी महाविद्यालय व महाराष्ट्र उच्च तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर कट्टा उपक्रमांतर्गत करिअर संसदेच्या पदाधिकारी विद्यार्थ्यांचा शपथविधी सोहळा जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. 'करिअर संसद' हा करिअर कट्टा उपक्रमांतर्गत राबविला जाणारा अत्यंत महत्त्वाकांक्षी युवा नेतृत्व विकास कार्यक्रम आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक व सामाजिक सर्वांगीण विकास साधणे, अकरा मंत्रीमंडळाच्या माध्यमातून प्रत्यक्ष अनुभववर आधारित नेतृत्व क्षमता वृद्धिंगत करणे, स्टार्टअप, उद्योजक भेटी व मुलाखतीद्वारे उद्योजकीय मानसिकता विकसित करणे. करिअर डायरी, तज्ज्ञ व्याख्याने व मुलाखतीद्वारे भविष्यातील दिशा निश्चिती, विद्यार्थांची व्यक्तिमत्त्व घडवणे, नोकरी मागणाऱ्या पेक्षा नोकरी देणारी पिढी घडविण्यासाठी उद्योजकीय दृष्टीकोन विद्यार्थ्यामध्ये निर्माण करणे, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, समाजाप्रती आपलं देणे काय आहे? या जबाबदारीची जाणीव विद्यार्थ्यामध्ये निर्माण करणे, करिअर कट्ट्याची मुख्य संकल्पना काय आहे याची माहिती प्रा. कविता मुर्तडक यांनी कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून दिली.

प्रत्येक विद्यार्थ्याला स्वयंपूर्ण व रोजगारक्षम करण्यासाठी कौशल्यपूर्ण शिक्षण देणे गरजेचे असून करिअर कट्ट्याच्या माध्यमातून युवा कौशल्यक्षम करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत, असे मत महाविद्यालयाच्या आय क्यू ए सी समन्वयक प्रा. योगिता घुगे यांनी मनोगत व्यक्त करताना केले. महाराष्ट्र राज्य उच्च तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व महाविद्यालय तसेच महाराष्ट्रातील अनेक महाविद्यालयं यांचा जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त करिअर संसद शपथविधी सोहळा एकाच वेळी झूम मिटिंगद्वारा ऑनलाइन व ऑफलाईन कार्यक्रमाचे देखील त्याचवेळी आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रमात जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त करियर संसद शपथविधी सोहळा संपन्न झाला. करियर संसद निवडणुकीची प्रक्रिया मागील महिन्यात संपन्न झाली असून त्यात विविध विद्यार्थ्यांनी आपला निवडणूक उमेदवारी अर्ज भरला. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा शपथविधी संपन्न झाला. यात कु. पायल जाधव मुख्यमंत्री, कु. कृष्णा खांदवे नियोजन मंत्री, कु. दीक्षा चौरे कायदे व शिस्तपालन मंत्री, कु. जयश्री गायकवाड सामान्य प्रशासन मंत्री, कु. पायल चौहान माहिती व प्रसारण मंत्री, कु. तनुजा अपसुंदे उद्योजकता विकास मंत्री, कु. ऋतुजा मोरे रोजगार, स्वयंरोजगार मंत्री, कु. जयदीप गवळी कौशल्य विकास मंत्री, कु. रोहित पाडवी संसदीय कामकाज मंत्री, कु. कस्तुरी घरटे महिला व बालकल्याण मंत्री तर शर्वरी कुलकर्णी हिने सदस्य म्हणून शपथ घेतली. सर्व मंत्र्यांना करिअर कट्ट्याकडून करिअर डायरी, प्रमाणपत्र व बॅच देण्यात आले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संगणकशास्त्र विभागाचा विद्यार्थी कु. पृथ्वीराज जगताप याने तर आभार प्रा. सारिका जगताप यांनी व्यक्त केले. कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील विद्यार्थी, विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

***

# महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**
**प्राचार्य : डॉ. ज्ञानेश्वर दाते**

## पालक शिक्षक सभा

शनिवार दि. १८ जुलै २०२६ रोजी शैक्षणिक वर्ष २०२६- २७ या वर्षातील पहिली पालक शिक्षक सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेचे आयोजन प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते व पालक शिक्षक संघ समिती प्रमुख प्रशालेच्या अध्यापिका सौ. सुजाता व्हनमाने यांनी केले. पालक शिक्षक सभेचा आरंभ ईशस्तवनाने करण्यात आला. ही पालक -शिक्षक सभा प्रथम इ. ५वी ते १०वीच्या सर्व वर्ग शिक्षकांनी वर्गवार घेतली. नंतर ही सभा एकत्रित घेण्यात आली. या सभेत प्रत्येक वर्गातून पालक प्रतिनिधी नेमून पालक शिक्षक संघाची स्थापना करण्यात आली व पदाधिकाऱ्यांची निवडही करण्यात आली. या सभेचे प्रास्ताविक अध्यापिका व पालक शिक्षक समिती प्रमुख सौ. सुजाता व्हनमाने यांनी केले. यानंतर अध्यापक श्री. विठ्ठल अनभुले यांनी तयार केलेल्या पी. पी. टी. च्या माध्यमातून शाळेतील सन २०२५-२६ मध्ये झालेले सर्व उपक्रम पालक-शिक्षक सभेत पालकांना दाखवण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांनी पालकांचे स्वागत व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टीने सर्वसमावेशक सूचना, शालाबाह्य स्पर्धा, शालाबाह्य परीक्षा, शालेय व संगणक फी, शिस्त, स्वच्छता, गुणवत्ता, दैनंदिन उपस्थिती, अशा विविध विषयांवर चर्चा केली. तसेच शासन आणि पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांच्या हिताच्या आणि आरोग्याच्या दृष्टीने पालकांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी अध्यापिका सौ. सविता जगताप यांनी अमलीपदार्थांविरोधात सर्व शिक्षक आणि पालकांकडून शपथ म्हणवून घेतली. याप्रसंगी डॉ. ज्ञानेश्वर दाते यांची प्राचार्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच अध्यापक श्री. प्रशांत बोंबलट यांची माध्यमिक विभागाचे शिक्षक प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन अध्यापिका सौ. सुजाता व्हनमाने यांनी केले. फलकलेखन प्रशालेचे सेवानिवृत्त अध्यापक श्री. नारायण रणदिवे यांनी केले. अध्यापिका श्रीमती वैशाली मोघे यांनी आभार मानले.

## संस्कृत महाकवी कालिदास दिन

बुधवार दि. १५.७.२०२६ रोजी 'महाकवी कालिदास दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. कालिदास दिनानिमित्त विद्यार्थी कु. सोहम जागडे, कु. आर्यन लोखंडे, कु. आराध्य यमे इ. ८वीच्या या विद्यार्थ्यांनी संस्कृत महाकवी व नाटककार कालिदासाचे चित्र फळ्यावर काढले. याप्रसंगी अध्यापिका श्रीमती वैशाली मोघे यांनी विद्यार्थ्यांना महाकवी कालिदास यांनी लिहिलेली काव्ये, व त्यांच्या जीवनावरील कथा प्रशालेतील विद्यार्थ्यांना सांगितल्या. तसेच या कथांवरून मानवी जीवनात ज्ञानाला अगाध महत्त्व असल्याचे सांगितले. याप्रसंगी कु. नफिया तांबोळी आणि कु. तन्वी कदम इ. ८वी या विद्यार्थिनींनी फलकलेखन केले.

## एकाग्रचित्ताची महती

शनिवार दि. ११ जुलै २०२६ रोजी परमपूज्य लोकनाथतीर्थ स्वामी महाराज नाशिक यांच्यातर्फे 'एकाग्रचित्ताची महती' या विषयावर कार्यक्रमाचे आयोजन केले. याप्रसंगी परमपूज्य लोकनाथतीर्थ स्वामी महाराज ट्रस्ट नाशिक येथील सदस्य श्री. रामकृष्ण कुलकर्णी यांनी श्वासाचे आणि एकाग्रचित्ताचे महत्त्व प्रशालेतील इ. ५वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांच्याकडून प्रात्यक्षिकही करवून घेतले तसेच, अनेक मनोरंजक गोष्टी सांगून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या ट्रस्टचे सदस्य श्री. प्रसन्न जोशी यांनीही एकाग्रचित्ताची महती याचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. याप्रसंगी या ट्रस्टचे सदस्य श्री. नाडकोडा, श्री. विजय भोईटे हेही या

कार्यक्रमास उपस्थित होते. याप्रसंगी प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर दाते यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली व पाहुण्यांची ओळख करून दिली. या कार्यक्रमास प्रशालेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व प्रशालेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता प्रशालेच्या अध्यापिका प्राजक्ता यांच्या आभार प्रदर्शनाने करण्यात आली.

***

# मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ शाखा, पुणे ३०

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**

**मुख्याध्यापिका : सौ. शिल्पा चितारे (प्राथमिक)**

**मुख्याध्यापिका : सौ. मधुमती कदम (माध्यमिक)**

## पूर्व प्राथमिक विभाग

### प्रवेशोत्सव

सोमवार दि. १५ जून २०२६ विद्यार्थ्यांचे स्वागत, औक्षण करून व पुष्प देऊन करण्यात झाले. सर्व वर्ग फुग्यांनी तसेच चार्ट व स्लोगन लावून सजविले होते. विद्यार्थ्यांसाठी ग्राउंडवर खेळ 'मेरी गो राऊंड' व 'जम्पिंग जॅक' मांडण्यात आले होते. विद्यार्थी खूप आनंदी व उत्साही दिसत होते. सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेट वाटण्यात आले.

### जागतिक योग दिन

निरोगी शरीर आणि शांत मन, याची एकच गुरूकिल्ली म्हणजे योगासन. विभागातील विद्यार्थ्यांनी जागतिक योग दिवस साजरा केला. विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. विद्यार्थ्यांकडून तालियोगा, मंडल आसन, फुलपाखरू आसन अशी विविध प्रकारची योगासने करून घेण्यात आली.

### पालक - शिक्षक सभा

मंगळवार दि. ३० जून २०२६ रोजी पालक - शिक्षक सभेचे आयोजन करण्यात आले होते. मुख्याध्यापकांनी पालकांना शाळेचे नियम, शाळेची शिस्त, युनिफॉर्म, केशरचना, शैक्षणिक शुल्क तसेच विद्यार्थ्यांना देण्यात येणारा टिफिन कसा असावा? या अशी विविध प्रकारची माहिती दिली. पालकांना असणाऱ्या शंकांचे निरसन करण्यात आले.

### डॉक्टर डे उत्साहात संपन्न

बुधवार दि. १ जुलै २०२६ रोजी 'डॉक्टर डे' साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी विद्यार्थी डॉक्टरांची वेशभूषा परिधान करून आले होते. तसेच डॉ. अमित गांधी यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी विद्यार्थ्यांना गोष्टी स्वरूपात लवकर झोपणे, लवकर उठणे, जेवताना हात स्वच्छ धुणे, दिवसातून दोनदा दात घासणे याचे महत्त्व आणि मोबाईलचे दुष्परिणाम या विषयी माहिती सांगितली. दोनही विभागांच्या मुख्याध्यापिकांच्या हस्ते डॉ. अमित गांधी यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.

### फादर्स डे

**''बाबांची संपत्ती नाही तर, बाबांची सावली सोबत असायला हवी ...!!''**

शनिवार दि. ४ जुलै २०२६ रोजी विद्यार्थ्यांनी 'फादर्स डे' साजरा केला. त्या दिवशी उपस्थित असलेल्या सर्व बाबांचे स्वागत करण्यात आले. 'बाबा' या नात्या विषयी थोडी माहिती देण्यात आली. उपस्थित बाबांसाठी विविध खेळ घेण्यात आले. तसेच वडील व मुलांचे एकत्रित नृत्य आयोजित करण्यात आले. यामध्ये विजेत्यांना बक्षीस देण्यात आले. पालकांनी या कार्यक्रमाचे व शिक्षकांचे कौतुक केले.

### ग्रीन डे

शुक्रवार दि. १७ जुलै २०२६ रोजी 'ग्रीन डे' म्हणजे 'हिरवा दिवस' साजरा करण्यात आला. सर्व विद्यार्थी हिरव्या रंगाचे कपडे परिधान करून आले होते. विद्यार्थ्यांनी डब्यात सुद्धा हिरव्या रंगाचा खाऊ आणला होता. विद्यार्थ्यांनी आणलेली तुळशीची रोपे कुंडी मध्ये कशी लावायची याचे प्रशिक्षण त्यांना देण्यात आले.

## पालखी सोहळ्याचे आयोजन

शुक्रवार दि. २४ जुलै २०२६ रोजी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. पालखी म्हटले की विठ्ठलाचे पंढरपूर, चंद्रभागा नदी आठवते. तसेच 'चंद्रभागेच्या तिरी, उभा मंदिरी, तो पहा विटेवरी, विठ्ठल विठ्ठल जय हरी!' हे गाणे ही आठवते.

विद्यार्थ्यांनी विठ्ठल, रुक्मिणी, विविध संत आणि वारकरी यांची वेशभूषा परिधान केली होती. प्रथम विठ्ठल, रुक्मिणी, मग संत आणि त्यानंतर वारकरी, तसेच डोक्यावर तुळशी वृंदावन घेतलेल्या विद्यार्थिनी अशी सुंदर वारी आयोजित केली होती. माऊलींचा जयघोष करताना रिंगण करण्यात आले. काही विद्यार्थिनींनी फुगडी घातली. सर्व विद्यार्थ्यांना राजगिरा वडीचा खाऊ देण्यात आला.

## गुरूपौर्णिमा सण उत्साहास साजरा

बुधवार दि. २९ जुलै २०२६ रोजी गुरूपौर्णिमे-निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी व्यासमुनी, रामदास स्वामी, ज्योतिबा महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा परिधान केली होती. याप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून पर्यवेक्षिका सौ. मनीषा नाईक उपस्थित होत्या. प्राथमिक आणि माध्यमिक विभगाच्या मुख्याध्यापिकांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. विद्यार्थ्यांनी श्लोक म्हटले आणि नृत्याचे सादरीकरण केले. ✻✻✻

**✻ मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कूल, सदाशिव पेठ शाखा, पुणे ३० ✻**




**बुधवार दि. १ जुलै २०२६ रोजी 'डॉक्टर डे' निमित्त आयोजित कार्यक्रम प्रसंगी उपस्थित प्रमुख पाहुणे डॉ. अमित गांधी यांच्या समवेत मुख्याध्यापिका, शिक्षिका आणि बालचमू**




**शुक्रवार दि. २४ जुलै २०२६ रोजी विठ्ठल, रुक्मिणी, विविध संत आणि वारकरी यांची वेशभूषा परिधान केलेले विद्यार्थी**

## महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र संपत कांबळे**

**प्र. प्राचार्य : प्रा. पी. व्ही. शिंदे**

### उन्हाळी परीक्षा २०२६ निकाल

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ मुंबई यांचे मार्फत घेण्यात आलेल्या उन्हाळी परीक्षा २०२६ चा निकाल दि. १८ जून २०२६ रोजी जाहीर करण्यात आला.

**वर्ग - तृतीय वर्ष**

| क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | प्राप्त शेकडागुण |
|---|---|---|
| प्रथम | कु. विक्रांत माने | ८६.४०% |
| द्वितीय | कु. आर्यन अकोले | ८५.२०% |
| तृतीय | कु. अथर्व घावट | ८४.६०% |

**वर्ग - द्वितीय वर्ष**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | कु. शुभम जाधव | ८२.५९% |
| द्वितीय | कु. प्रणव वाळुंज | ८०.००% |
| तृतीय | कु. ओमकार नरोडे | ७९.१८% |

**वर्ग - प्रथम वर्ष**

| | | |
|---|---|---|
| प्रथम | कु. गौरव बेरड | ८५.५३% |
| द्वितीय | कु. संकेत माने | ८०.८२% |
| तृतीय | कु. अवनी काबरा | ७८.५९% |

**सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

### गुणवंत विद्यार्थी सत्कार

दि पूना प्रेस ओनर्स असोसिएशन लिमिटेड, पुणे यांच्या वतीने डिप्लोमा इन प्रिंटिंग टेक्नॉलॉजी मधील तीनही वर्गात प्रथम आलेल्या कु. विक्रांत माने, कु. शुभम जाधव व कु. गौरव बेरड या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. दि. २७ जून २०२६ रोजी सदर गुणगौरव समारंभ पार पडला. दि पुन्हा प्रेस ओनर्स असोसिएशनचे अध्यक्ष श्री. राहुल दत्तात्रय मारुलकर यांचे सदर उपक्रमाबाबत हार्दिक आभार.

### रेस पॅक २०२६

रेस पॅक २०२६ दि. ८ व ९ जून २०२६ रोजी हॉटेल ललित महल, मुंबई येथे पार पडली. संस्थेतील द्वितीय व तृतीय वर्षातील काही विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून काम केले. या उपक्रमाचा उपयोग औद्योगिक संस्थांशी विद्यार्थ्यांचा संपर्क वाढवण्यासाठी होतो. सदर कार्यक्रमाचे संयोजन प्र. प्राचार्य श्री. पी. व्ही. शिंदे यांनी केले.

### प्लेसमेंट २०२६

प्रतिवर्षीप्रमाणे अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी प्लेसमेंटचे आयोजन केले जाते. सदर प्रक्रिया अजून चालू असून आत्तापर्यंत खालील कंपन्यांनी आपापली निवड प्रक्रिया पूर्ण केली आहे.

| कंपनीचे नाव | निवड झालेले विद्यार्थी | वार्षिक वेतन रुपये (लाख) |
|---|---|---|
| प्रदीप लॅमिनेटर | ५ | ३.३० |
| अजंठा प्रिंट आर्ट | १ | २.६४ |
| बिट्स इंडिया प्रा.लि. गोवा | १ | २.४० |
| रुद्रा पॅक सोल्युशन प्रा. लि. | १ | २.४० |
| स्टेनोरा प्रिंट आर्ट | १ | २.४० |

वरील प्लेसमेंटचे संयोजन प्राध्यापक श्री. शंकर शेळकंदे यांनी केले.

***

### दुरुस्ती समाचार माहे जुलै २०२६ पृष्ठ क्र. ४६

**नाव** - **श्रीमती नंदा विनय गोखले, बेलापूर**

**देणगी** - रु. ५१,०००/-

**दिनांक** - २३.६.२०२६

**निमित्त** - कै. विनय श्रीधर गोखले यांचे प्रथम पुण्यस्मरणार्थ (२३ जून)

विनियोग - देणगी व्याज विनियोग
कला विषयात प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासाठी

***

# ✻ महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे ३० ✻

## उन्हाळी परीक्षा २०२६ निकाल

### तृतीय वर्ष


कु. विक्रांत माने
८६.४०%
प्रथम


कु. आर्यन अकोले
८५.२०%
द्वितीय


कु. अथर्व घावट
८४.६०%
तृतीय

### द्वितीय वर्ष


कु. शुभम जाधव
८२.५९%
प्रथम


कु. प्रणव वाळुंज
८०.००%
द्वितीय


कु. ओमकार नरवडे
७९.१८%
तृतीय

### प्रथम वर्ष


कु. गौरव बेरड
८५.५३%
प्रथम


कु. संकेत माने
८०.८२%
द्वितीय


कु. अवनी काबरा
७८.५९%
तृतीय

# कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र सं. कांबळे**

**प्राचार्य : डॉ. संजयकुमार गायकवाड**

**रौप्य महोत्सवी वर्धापन दिन उत्साहात संपन्न**

महाविद्यालयाचा २५ वा वर्धापन दिन मंगळवार दि. १४ जुलै २०२५ रोजी कुलगुरू दादासाहेब केतकर सभागृहात उत्साहात पार पडला. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून Maharashtra Knowledge Corporation Limited चे मुख्य सल्लागार श्री. विवेक सावंत उपस्थित होते. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पराग काळकर, पुणे महानगरपालिकेचे उपमहापौर श्री. परशुराम वाडेकर हे मान्यवर अतिथी म्हणून लाभले होते. या प्रसंगी संस्थेचे सर्व पदाधिकारी, माजी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक व विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. महाविद्यालयाच्या २५ वर्षांच्या प्रवासाचे दर्शन घडविणारा माहितीपट प्रदर्शित करण्यात आला, कार्यक्रमाची सुरूवात दीप प्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने झाली. संस्थेचे गौरव गीत व महाराष्ट्र गीताने सर्वांना मंत्रमुग्ध केले. रौप्य महोत्सवानिमित्त तयार करण्यात आलेल्या स्मरणिकचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. संस्था संचालक व महाविद्यालय प्रमुख डॉ. राजेंद्र कांबळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत करत हा प्रवास केवळ २५ वर्षांचा नाही तर असंख्य आठवणींचा, अथक परिश्रमांचा, जिद्दीचा, सामूहिक प्रयत्नांचा असून प्रत्येक यशामागे संस्थेचे सर्व संचालक, मार्गदर्शक, कर्मचारी, सहकारी, हितचिंतक आणि महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थी यांचा अमूल्य सहभाग आहे, अशा शब्दात मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमास उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे Maharashtra Knowledge Corporation Limited चे मुख्य सल्लागार श्री. विवेक सावंत यांनी मानवी बुद्धी ही 'युज इट और लूज इट' या तत्त्वावर काम करते, आर्टिफिशिय इंटेलिजन्सला स्पर्धक नव्हे तर, विचारशक्ती वाढविणारे साधन म्हणून स्वीकारा. तंत्रज्ञान नोकऱ्या संपवत नाही, तर नव्या रोजगार संधी निर्माण करते त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वतःची आवड, क्षमता आणि करिअरच्या नव्या वाटांचा शोध घेत कौशल्याधारीत शिक्षण आणि नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा. अपेक्षित प्रश्नांना अपेक्षित उत्तरे दिल्यास अपेक्षित गुण मिळतात, हा विचार सोडावा लागणार असल्याचेही स्पष्ट करत विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

या प्रसंगी मान्यवर अतिथी म्हणून लाभलेले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन करत नमूद केले की, सतत शिकण्याची वृत्ती, जिज्ञासा आणि नवीन अनुभवांच्या माध्यमातून आपल्या ज्ञानाच्या कक्षा विस्तारत रहा, वेळेचे नियोजन, नेतृत्व गुण, प्रभावी संवाद कौशल्य आणि विश्लेषणात्मक विचारसरणी विकसित करा. इंटर्नशिप प्रकल्प आणि उद्योगाभिमुख उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन सैद्धांतिक ज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभवाशी मेळ घाला.

पुणे महानगरपालिकेचे उपमहापौर मा. श्री. परशुराम वाडेकर यांनी विद्यार्थ्यांना प्रगतीमध्ये अडथळा आणणाऱ्या बाह्य विचलनापासून स्वतःला दूर ठेवण्याचा अनमोल सल्ला दिला तसेच आपल्या प्रत्येक कृतीमध्ये नैतिकता, मूल्ये आणि सामाजिक जबाबदारी जपत भूतकाळातील यश किंवा अपयश यांचा भार न बाळगता नव्या उमेदीने आणि स्पष्ट ध्येयाने नवीन सुरूवात करण्याचा उपदेश देत स्वतःच्या बालपणापासूनचे अनुभव सांगत, प्रेरणादायी विचारांनी विद्यार्थ्यांना केवळ एक पदवी म्हणून नव्हे तर, व्यक्तिमत्त्व घडवणारा, जबाबदार, नाविन्यपूर्ण आणि प्रभावी नेतृत्व निर्माण करणारा जीवन प्रवास म्हणून पाहण्याची प्रेरणा दिली. विद्यार्थ्यांनी शिक्षणाची योग्य दिशा कशी ठरवावी याबद्दल मौल्यवान भाष्य केले. तसेच पुणे महानगरपालिकेतर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या सर्व

उपक्रमांमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहनही केले.

या रौप्य महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त उपस्थित पदाधिकारी, पाहुणे, माजी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापिका तेजल चोथे तर पाहुण्यांचा परिचय आय.क्यू.ए.सी समन्वयक डॉ. स्वाती जोशी, सहाय्यक प्राध्यापिका ज्योती पाटील, सहाय्यक प्राध्यापिका डॉ. शीतल सुकटे यांनी करून दिला. तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांनी केले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन**

महाविद्यालयाच्या २५ व्या रौप्य महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त आचार्य आनंदऋषी, पुणे ब्लड सेंटर, नवी पेठ यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या प्रांगणात रक्तदान शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन महाविद्यालय प्रमुख व संस्थेचे संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, महाविद्यालयाच्या उपप्राचार्य रेखा जोशी, आय.क्यू.ए.सी समन्वयक डॉ. स्वाती जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिराचे आयोजन व नियोजन सहाय्यक प्राध्यापक डॉ. शिवाजी गोडावले यांनी महाविद्यालयाच्या आय.क्यू.ए.सी समन्वयक डॉ. स्वाती जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तमरित्या पार पाडले. तसेच या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामागे राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांचा मोलाचा वाटा होता. एकूण ६४ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले. सर्व रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

या प्रसंगी संस्थेचे संचालक व महाविद्यालय प्रमुख डॉ. राजेंद्र कांबळे, प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड, उपप्राचार्य रेखा जोशी यांनी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत 'रक्तदान, हेच श्रेष्ठ दान' असून एका रक्तदात्यामुळे अनेक रुग्णांना जीवदान मिळू शकते असे प्रतिपादन केले.

**माजी विद्यार्थी मेळाव्याचे यशस्वी आयोजन**

महाविद्यालयाच्या २५ व्या रौप्य महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला माजी विद्यार्थी मेळावा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाला ४० हून अधिक विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे माजी विद्यार्थी, शिक्षक आणि विद्यमान विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात दीप प्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांनी उपस्थितांचे स्वागत करून संस्थेच्या २५ वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आढावा घेतला. याप्रसंगी उपप्राचार्य रेखा जोशी तसेच आय.क्यू.ए.सी समन्वयक डॉ. स्वाती जोशी यांनी महाविद्यालयाच्या विकासासाठी माजी विद्यार्थ्यांनी विविध उपक्रमांमध्ये सहकार्य करावे असे आवाहन केले. माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक जीवनातील आठवणींना उजाळा देत करिअर, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक जबाबदारी, तंत्रज्ञानातील होणारे बदल याबाबत मनोगतपर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थीनी व सहाय्यक प्राध्यापिका प्रियांका खुटवड यांनी उत्तमरित्या पार पाडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापिका सपना मालपानी तर आभार प्रदर्शन सहाय्यक प्राध्यापिका सपना मुलमुले यांनी केले. या यशस्वी मेळाव्यामुळे माजी विद्यार्थी आणि महाविद्यालयामधील स्नेहबंध अधिक दृढ झाले असून महाविद्यालयाच्या विकासासाठी नव्या संधी निर्माण होतील, असा विश्वास यावेळी संस्था संचालक व महाविद्यालयाचे प्रमुख डॉ. राजेंद्र कांबळे यांनी व्यक्त केला. महाविद्यालयाच्या २५ वर्षांच्या प्रवासाचे दर्शन घडविणारा माहितीपट प्रदर्शित करण्यात आला. त्यानंतर सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला.

***

## ❊ कॉलेज ऑफ सायन्स अॅण्ड कॉमर्स, पुणे ९ ❊



मंगळवार दि. १४ जुलै २०२५ रोजी रौप्य महोत्सवी वर्ष सांगता समारंभात प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन प्रसंगी उपस्थित प्रमुख पाहुणे **Maharashtra Knowledge Corporation Limited** चे मुख्य सल्लागार श्री. विवेक सावंत व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पराग काळकर, संस्था पदाधिकारी, संचालक, प्राचार्य, उपप्राचार्य व आयक्यूएससी सन्मवयिका



संचालक डॉ. राजेंद्र कांबळे यांचा सत्कार करताना श्री. विवेक सावंत, समवेत उपस्थित मान्यवर




प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांचा सत्कार करताना पुणे महानगरपालिकेचे उपमहापौर श्री. परशुराम वाडेकर, समवेत उपस्थित मान्यवर



महाविद्यालयाच्या नवीन सुसज्ज इमारतीचे फीत कापून उद्घाटन करताना प्रमुख पाहुणे श्री. विवेक सावंत, समवेत संस्थेच्या नियामक मंडळाच्या सदस्या श्रीमती पूर्णिमा लिखिते, डॉ. निहार वाळिंबे, संस्था पदाधिकारी, संचालक, प्राचार्य आदी मान्यवर






महाविद्यालयातील अद्ययावत लॅब्जची पहाणी करताना श्री. विवेक सावंत, समवेत संचालक, प्राचार्य, उपप्राचार्य, समन्वयिका आदी मान्यवर

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पुणे विभाग

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

**दि. १.५.२०२६ ते ३१.५.२०२६**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे.**
**संस्थेविषयी दर्शवित असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**
**(देणगी व्याजाचा विनियोग देणगी प्राप्त झाल्यानंतर पुढील वर्षापासून १५ वर्षांपर्यंत केला जातो.)**

देणगी रु. १०,००१/- वरील सर्व

●**नाव** - **सरस्वती विनायक चॅरिटेबल ट्रस्ट श्री. अतुल विनोद व श्री. अरूण मधुकर आपटे, पुणे**
**देणगी** - रु. ६१,०००/-
**दिनांक** - ३०.६.२०२६
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी रक्कम रु. ३६,०००/- विनियोग संस्थेच्या सिंधूताई त्र्यंबक केंघे मुलींच्या वसतिगृहातील गरीब, गरजू व हुशार विद्यार्थिनींना शैक्षणिक मदत देण्यासाठी उर्वरित रु. २५,०००/- विनियोग संस्थेच्या महाराष्ट्र विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे डिजिटल स्मार्ट क्लास रूम तयार करण्यासाठी

●**नाव** - **सौ. मीना रघुनंदन जोशी, पुणे**
**देणगी** - रु. ४०,०००/-
**दिनांक** - ३०.६.२०२६
**निमित्त** - कै. मधुकर गजानन आपटे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी रक्कम रु. २५,०००/- विनियोग गरीब, गरजू व हुशार आश्रमीय विद्यार्थांच्या योगक्षेम खर्चासाठी उर्वरित रु. १५,०००/-विनियोग संस्थेच्या कै. सिंधुताई त्र्यंबक केंघे मुलींच्या वसतीगृहातील गरीब, गरजू व हुशार विद्यार्थीनीस शैक्षणिक मदतीसाठी

●**नाव** - **श्री. अतुल मुकुंद विनोद, पुणे**
**देणगी** - रु. २५,०००/-
**दिनांक** - ३०.६.२०२६
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्यासाठी


शिरीन गुमास्ते

●**नाव** - **श्री. शिरीष वसंत गुमास्ते, पुणे**
**देणगी** - रु. २५,०००/-
**दिनांक** - २७.६.२०२६
**निमित्त** - कै. सौ. शिरीन शिरीष गुमास्ते यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग आश्रमीय विद्यार्थ्यांच्या योगक्षेम खर्चासाठी

●**नाव** - **श्री. रमेश भास्कर ढमढेरे, पुणे**
**देणगी** - रु. २१,०००/-
**दिनांक** - ८.६.२०२६
**निमित्त** - कै. रवींद्र भास्कर ढमढेरे व आई कै. श्रीमती इंदिरा भास्कर ढमढेरे यांचे स्मृतिदिनानिमित्त (१८ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग गुलाबजाम मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●**नाव** - **श्री. विराज राजीव अभ्यंकर, पुणे**
**देणगी** - रु. १९,५००/-
**दिनांक** - २१.६.२०२६
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी रु. १५,०००/- विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन
उर्वरित रु. ४,५००/- विनियोग अल्पोपहार साबुदाणा खिचडी देण्यासाठी


प्रदीप घुले

●**नाव** - **श्रीमती नीला प्रदीप घुले, पुणे**
**देणगी** - रु. १९,०००/-
**दिनांक** - २९.६.२०२६
**निमित्त** - कै. प्रदीप प्रभाकर घुले यांचे स्मृतिदिनानिमित्त (२ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

●**नाव** - **सौ. उर्मिला महादेव कलशेट्टी, पुणे**
**देणगी** - रु. १३,५००/-
**दिनांक** - १२.६.२०२६
**निमित्त** - कै. कमलाबाई लिंगाप्पा कलशेट्टी यांचे स्मृतिदिनानिमित्त (६ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह भोजन

●**नाव** - **श्रीमती वैजयंती सदाशिव गोगावले, पुणे**
**देणगी** - रु. ११,०००/-
**दिनांक** - १५.६.२०२६
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग आश्रम वसतिगृहातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत

देणगी रु. ५,००१/- ते रु. १०,०००/-

●**नाव** - **सौ. सुषमा रामचंद्रन, कल्याण (प.)**
**देणगी** - रु. ६,००१/-
**दिनांक** - १०.६.२०२६
**निमित्त** - अधिकमासानिमित्त सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **चि. आदित्य प्रदीप अत्रे द्वारा डॉ. सौ. मीनाक्षी प्रदीप अत्रे, पुणे**
**देणगी** - रु. १०,०००/-
**दिनांक** - १६.६.२०२६
**निमित्त** - चि. आदित्य यास आय. आय. टी. मद्रास येथे उच्चशिक्षणासाठी प्रवेश मिळाल्याबद्दल
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

●**नाव** - **श्रीमती प्राची प्रसाद कोल्हटकर, पुणे**
**देणगी** - रु. ५,५००/-
**दिनांक** - १९.६.२०२६
**निमित्त** - कै. प्रसाद विलास कोल्हटकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (आषाढ शुध्द २)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग अन्नदान

देणगी रु. ४,००१/- ते रु. ५,०००/-

●**नाव** - **सौ. प्रतिभा काशिनाथ सरदेशमुख, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १२.६.२०२६
**निमित्त** - अधिक मासानिमित्त सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. ३,००१/- ते रु. ४,०००/-**

●**नाव - श्रीमती स्मिता कीर्तीकुमार लिमये, पुणे**
**देणगी** - रु. ४,०००/-
**दिनांक** - २४.६.२०२६
**निमित्त** - कै. कीर्तीकुमार लिमये यांचे श्राध्दानिमित्त (२ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अल्पोपहार साबुदाणा खिचडी देण्यासाठी

**देणगी रु. २,००१/- ते रु. ३,०००/-**

●**नाव - श्री. मनोहर माधव देव, मुंबई**
**देणगी** - रु. ३,०००/-
**दिनांक** - १९.६.२०२६
**निमित्त** - कै. मंगलाबाई माधव देव यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव - श्रीमती सुनंदा जगन्नाथ देशपांडे, पुणे**
**देणगी** - रु. ३,०००/-
**दिनांक** - २०.६.२०२६
**निमित्त** - कै. जगन्नाथ दत्तात्रय देशपांडे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. १,००१/- ते रु. २,०००/-**

●**नाव - सौ. भारती सतीश काळे, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - ८.६.२०२६
**निमित्त** - कै. नलिनी यशवंत काळे यांचे स्मृतिदिनानिमित्त (१० जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण विनियोग अन्नदान

●**नाव - कु. ऐश्वर्या आमोद साने, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - १२.६.२०२६
**निमित्त** - आजोबा कै. भालचंद्र माधव केळकर यांचे जयंतीनिमित्त (२२ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न


उषा अरविंद साने

●**नाव - चि. इशांत आमोद साने, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - १२.६.२०२६
**निमित्त** - आजी कै. उषा अरविंद साने यांचे जयंतीनिमित्त (२८ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●**नाव - श्रीमती वासंती हणमंत पाडळे, पुणे**
**देणगी** - रु. १,०११/-
**दिनांक** - १२.६.२०२६
**निमित्त** - अधिक मासानिमित्त सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव - श्री. अरूण वसंत बोकिल, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - २९.६.२०२६
**निमित्त** - कै. सिंधु वसंत बोकिल यांचे स्मृतिदिनानिमित्त (ज्येष्ठ वद्य ६))
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव - श्री. श्रीकांत व श्री. चिंतामणी वासुदेव देशपांडे, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - २९.६.२०२६
**निमित्त** - कै. सदाशिव रामचंद्र आरणके यांचे स्मृतिदिनानिमित्त (२४ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

## देणगी रु. ५०१ ते १,०००/-

●**नाव** - **सौ. सुलभा विजय ताम्हनकर, सांगली**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - ९.६.२०२६
**निमित्त** - अधिक मासानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **सौ. वैशाली सबनीस, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - २५.६.२०२६
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●**नाव** - **श्री. चंद्रकांत गोविंद भालेराव, (मा. वि.) पुणे**


श्री. चंद्रकांत भालेराव

**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - २९.६.२०२६
**निमित्त** - कै. गोविंद लक्ष्मण भालेराव यांचे स्मृतिदिनानिमित्त (२ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

## देणगी रु. ५००/- खालील सर्व

●**नाव** - **मा. विश्वस्त आर. के. करंदीकर मेमो. ट्रस्ट, पुणे**
**देणगी** - रु. २५०/-
**दिनांक** - १२.६.२०२६
**निमित्त** - कै. आर. के. करंदीकर व कै. श्रीमती इंदिराबाई आर. करंदीकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (१५ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

## वाढदिवसानिमित्त व विवाह वाढदिवसानिमित्त दिलेल्या देणग्या

●**नाव** - **डॉ. चंद्रशेखर श्रीहरी पुरंदरे, (मा. वि.) सांगली**
**देणगी** - रु. ६९,०१०/-
**दिनांक** - २९.६.२०२६
**निमित्त** - स्वतःच्या वाढदिवसानिमित्त तसेच संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

●**नाव** - **श्री. विकास एकनाथ डावरे, पुणे**
**देणगी** - रु. ७,५००/-
**दिनांक** - २९.६.२०२६
**निमित्त** - चि. रविराज विकास डावरे याचे वाढदिवसानिमित्त (१ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **सौ. कुमुदिनी बापूराव पवार, पुणे**
**देणगी** - रु. ५,००१/-
**दिनांक** - १९.६.२०२६
**निमित्त** - चि. आदित्य बापूराव पवार याचे वाढदिवसानिमित्त (२२ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●**नाव** - **सौ. कल्पना रविंद्र सोनार, नेरूळ नवी मुंबई**
**देणगी** - रु. १,१००/-
**दिनांक** - २३.६.२०२६
**निमित्त** - कु. स्वराली हिचे वाढदिवसानिमित्त (२२ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

●**नाव** - **सौ. सुजाता श्रीकांत घोरपडे, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - २५.६.२०२६
**निमित्त** - मुलगा चि. श्रीनिवास घोरपडे याचे वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग बिस्किट पुडे देण्यासाठी प्राप्त

●**नाव** - **श्री. मारूती गुणाजी घडशी, पुणे**
**देणगी** - रु. ५१०/-
**दिनांक** - २३.६.२०२६
**निमित्त** - चि. ओम नरेंद्र रेवाळे याचे वाढदिवसानिमित्त (११ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

**दुरुस्ती समाचार माहे जुलै २०२६ पृष्ठ क्र. ३६**

●**नाव** - **श्री. किरण वामन इनामदार (मा. वि.), सौ. करुणा किरण इनामदार, सांगली**



श्री. किरण व सौ. करूणा इनामदार

**देणगी** - रु. १,००,०००/-
**दिनांक** - १९.५.२०२६
**निमित्त** - संस्थेच्या ११७ व्या वर्धापन दिनानिमित्त व माजी विद्यार्थी ऋणविमोचनार्थ
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

**वस्तुरूप देणगी अंदाजे मूल्य रु.**

- **लॉडेज सेंट अँड्रयूज द ईस्ट, पुणे**
  गहू ३६० कि., तांदूळ २४० कि., साखर ५० कि., रु. २३,३३४/-
- **सौ. सुनीती पांडे, पुणे**
  कै. निर्मला काळे यांचे स्मृतिदिनानिमित्त जिलेबी ८ कि. ४०० ग्रॅम ३,२००/-
- **श्री. अमोल भुतडा, पुणे**
  चि. आर्यन व कु. रिवा यांचे वाढदिवसानिमित्त वह्या फुलस्केप ३६ नग, रु. २,२५०/-
- **कु. दलिका राजस जोशी, पुणे**
  स्वतःच्या वाढदिवसानिमित्त, रवा २ कि., साबुदाणा २ कि., तेल ८०० ग्रॅम, शेंगदाणे १ कि., पोहे ३ कि., तूप १ कि., रु. १,५९४/-
- **श्री. संजीव मोरेश्वर कुलकर्णी, पुणे**
  अधिक ज्येष्ठ मासानिमित्त, साबुदाणा १० कि., पोहे १० कि. रु. १,१००/-

***

●**नाव** - **श्री. विश्वास रघुनाथ शिंदे (मा. वि.), पुणे**



श्री. विश्वास शिंदे

**देणगी** - रु. ५१,०००/-
**दिनांक** - २५.५.२०२६
**निमित्त** - माजी विद्यार्थी ऋणविमोचनार्थ सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थेच्या विविध प्रकल्पांच्या वाढीसाठी

***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, तळेगांव (अं) शाखा

**उपाकार्याध्यक्ष – श्री. अमोल जोशी**

**दि. १.५.२०२६ ते १५.७.२०२६**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**



सौ. वैजयंती जोगळेकर

- **नाव** - **सौ. वैजयंती अरविंद जोगळेकर, पुणे**

**देणगी** - रु. २,००,०००/-
**दिनांक** - ७.५.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी

**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग विद्यालयासाठी नवीन पुस्तके खरेदीसाठी

**खालील दोन्ही देणग्या तळेगाव (अं.) शाखेच्या विकासासाठी देण्यात आलेल्या आहेत**



श्री. शरद कोठावदे

- **नाव** - **श्री. शरद पोपटराव कोठावदे, नाशिक**

**देणगी** - रु. २,००,०००/-
**दिनांक** - १३.५.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी



श्री. सुकदेव निंबेकर

- **नाव** - **श्री. सुकदेव लहानू निंबेकर, तळेगाव (अं.), नाशिक**

**देणगी** - रु. १,००,०००/-
**दिनांक** - १३.५.२०२५
**निमित्त** - सदिच्छा देणगी

**वस्तुरूप देणगी**

- **नाव** - **सौ. पुष्पा दिलीप वाघ, कल्याण**

**देणगी** - रु. ११,७२५/-
**दिनांक** - १०.७.२०२६
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - रु. ११,७२५/- किमतीचे १९ गणवेश

- **नाव** - **सौ. शलाका विराज कुलकर्णी, पुणे**

**देणगी** - रु. ११,३७५/-
**दिनांक** - २५.६.२०२६
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - रु. ११,३७५/- किमतीचे २० गणवेश

- **नाव** - **सौ. सविता राजेंद्र कुलकर्णी, नाशिक**

**देणगी** - रु. ६,०००/-
**दिनांक** - २.७.२०२६
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - रु. ६,०००/- किमतीचे १० गणवेश

- **नाव** - **सौ. अश्विनी चेतन गोऱ्हे, नाशिक**

**देणगी** - रु. ४,०००/-
**दिनांक** - १४.७.२०२६
**निमित्त** - विवाह वर्धापनदिनानिमित्त
**विनियोग** - रु. ४,०००/- किमतीचे प्रथमोपचार साहित्य

- **नाव** - **सौ. सुवर्णा किशोर जोशी, ठाणे**

**देणगी** - रु. २,०१०/-
**दिनांक** - १०.७.२०२६
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - रु. २,०१०/- किमतीचे ६ गणवेश ✲

## ❊ कॉलेज ऑफ सायन्स अॅण्ड कॉमर्स, पुणे ९ ❊



दि. १४ जुलै २०२६ रोजी संस्थेच्या कॉलेज ऑफ सायन्स अॅण्ड कॉमर्स, पुणे ९ च्या रौप्यमहोत्सवी वर्ष सांगता समारंभ प्रसंगी दीप प्रज्वलन करताना प्रमुख पाहुणे मा. श्री. विवेक सावंत मुख्य मार्गदर्शक, एमकेसीएल, आणि मा. डॉ. पराग काळकर, प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



मा. श्री. विवेक सावंत यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत मा. डॉ. पराग काळकर



मा. डॉ. पराग काळकर यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत मा. श्री. विवेक सावंत व संस्था पदाधिकारी



पुणे महानगरपालिकेचे उपमहापौर मा. श्री. परशुराम वाडेकर यांचा सत्कार करताना कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, समवेत डावीकडून उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, श्री. विवेक सांवत, कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, संचालक डॉ. राजेंद्र कांबळे आणि श्री. सुनील रेडेकर




महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त स्मरणिकेचे प्रकाशन करताना उपस्थित मान्यवर

**SAMACHAR - Registered RNI No. 14546 / 1957.**
**Decl. No. SDO / PUNE / SR / 74 / 2016**
**[Publication Date 13.8.2026 Posting Date 15.8.2026]**

**Periodical Post**

## ✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, तळेगांव (अं), नाशिक ✻



दि. ३० जून २०२६ रोजी सेवानिवृत्तीनिमित्त प्राचार्य श्री. शरद कोठावदे सपत्नीक, यांचा सत्कार करताना उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी समवेत कोठावदे कुटुंबीय



दि. ३० जून २०२६ रोजी सेवानिवृत्तीनिमित्त श्री. सुकदेव निंबेकर सपत्नीक, यांचा सत्कार करताना उपकार्याध्यक्ष श्री. अमोल जोशी, समवेत सुकदेव कुटुंबीय

♦ पुणे विद्यार्थी गृह ♦

▣ पुणे शाखा – (०२०) २४४७०९२७, २४४७०५७३, २४४७९०५८
▣ मुंबई शाखा – (०२२) २५०६२३२२, फॅक्स : (०२०) २५०६४९३५
▣ नवी मुंबई (नेरूळ) शाखा – (०२२) २७७२३४१८
▣ नाशिक शाखा – (०२५३) २५११३०६ ▣ म्हसरूळ शाखा – (०२५३) २५३४२९१
▣ तळेगाव अंजनेरी शाखा – (०२५९४) २२२२२७

कृपया आपल्या प्रतिक्रिया **pvgsamachar@gmail.com** या ई मेल वर नोंदवाव्यात.

**This monthly Samachar is printed on behalf of**
**Pune Vidyarthi Griha by Printer and Publisher Mr. Subhash Mallappa Jirge**
**at Maharashtra Mudranshala Chhapkhana,1786, Sadashiv Peth, Pune 411030**
**and Published at Pune Vidyarthi Griha, 1786, Sadashiv Peth, Pune 411030.**
**Editor : Mr. Rajendra Vitthal Borhade**

**समाचार हे मासिक पुणे विद्यार्थी गृह संस्थेकरिता मुद्रक, प्रकाशक श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे यांनी**
**महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून**
**पुणे विद्यार्थी गृह, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले.**
**संपादक श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे**